cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–७३ | मंगळवार दि.०२ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### दुष्काळाचे सावट आणि अर्थव्यवस्थेची कसोटी

देशाची अर्थव्यवस्था सध्या अनेक आघाड्यांवर गंभीर आव्हानांना सामोरी जात आहे. इंधनाचा वाढता तुटवडा, पेट्रोल–डिझेलच्या सतत वाढणाऱ्या किमती, महागाईचा भडका, रुपयाचे होत असलेले अवमूल्यन, परकीय चलनसाठ्यातील घट आणि जागतिक आर्थिक अनिश्चितता यामुळे सामान्य नागरिकांपासून उद्योगजगतापर्यंत सर्वच घटक चिंतेत आहेत. अशा परिस्थितीत भारतीय हवामान विभागाने यंदाच्या मान्सूनबाबत व्यक्त केलेला सुधारित अंदाज हा संकटात आणखी भर घालणारा ठरत आहे.

# कर्जमाफीचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र सरकारच्या प्रस्तावित 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने'चा लाभ मिळविण्यासाठी पात्र शेतकऱ्यांकडे ॲग्रीस्टॅक नोंदणी असणे बंधनकारक करण्यात आले आहे. ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीककर्ज थकित असलेल्या पात्र शेतकऱ्यांना या योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ देण्याची तयारी शासनाने सुरू केली असून, ३० जूनपूर्वीच कर्जमाफीची अंमलबजावणी करण्यासाठी हालचाली वेगाने सुरू आहेत.**




कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, यापुढे कोणत्याही शेतीविषयक शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी अनिवार्य राहणार आहे. त्यामुळे राज्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी लवकरात लवकर फार्मर आयडी तयार करून घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. नोंदणी प्रक्रिया गतीमान करण्यासाठी ग्रामस्तरावर विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. महा ई–सेवा केंद्र चालक, सरपंच, स्थानिक पदाधिकारी, सोसायटी सचिव, ग्राम महसूल अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी आणि ग्रामपंचायत अधिकारी यांच्या समन्वयातून उर्वरित नोंदी पूर्ण केल्या जाणार आहेत. तसेच प्रत्येक लाभार्थ्याशी संपर्क साधून त्याच्या नोंदणीची सद्यस्थिती तपासून आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. लाभार्थी शेतकरी मयत असल्यास वारसा नोंद पूर्ण करून वारसाची ॲग्रीस्टॅक नोंदणी करण्यास सांगण्यात आले आहे. तसेच जमीन मालकी नसतानाही पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा लाभ घेत असल्याचे आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांच्या संयुक्त स्वाक्षरीने त्याबाबतचा ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### राज्यात यंदा सरासरीच्या ९८ टक्के पाऊस–डॉ. साबळे

पुणे: देशात जरी सरासरीच्या ९० टक्के एवढाच पाऊस पडणार असला तरी राज्यात सरासरीच्या ९८ टक्के पाऊस पडणार आहे. पावसाचे वितरण असमान राहणार असून पावसाचे खंड पडण्याची शक्यता आहे असा अंदाज जेष्ठ कृषी हवामान तज्ज्ञ डॉ. रामचंद्र साबळे यांनी दिला आहे. यासंदर्भातील पत्रकार परिषद घेऊन त्यांनी हा अंदाज व्यक्त केला. राज्यात यंदा पाऊस कमी आहेच पण खूप कमी पाऊस आहे असं नाही. भारतीय हवामानशास्त्र विभागाने देशात ९० टक्के पावसाचा अंदाज दिला आहे. पण महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण जास्त असेल. दरम्यान, तरीही शेतकऱ्यांनी पाणी जपून वापरणे, कमी पाण्यात येणाऱ्या पिकांची लागवड करणे आणि आंतरपीक पद्धतीचा वापर करणे या गोष्टीची आवश्यकता आहे.

### ई–बसेससाठी चार्जिंग स्टेशनचे जाळे उभारा

मुंबई: 'विकसित महाराष्ट्र अंतर्गत' पर्यंत एसटी महामंडळामध्ये सन २०२९ पर्यंत ५० टक्के, २०३५ पर्यंत ८० टक्के; तर २०४७ पर्यंत एसटीचा १०० टक्के ताफा ई–बसेसमध्ये रूपांतरीत करायचा आहे. या अनुषंगाने बसेससाठी आवश्यक असलेले चार्जिंग स्टेशन उभारण्याच्या कामाला गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा येथील निवासस्थानी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या इ–बसेससंदर्भात बैठक झाली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक (दूरदृश्य प्रणालीद्वारे), मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, अपर मुख्य सचिव संजय सेठी, एसटीचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, उपसचिव चेतन निकम आदी या बैठकीस उपस्थित होते.

### उष्णतेची लाट ओसरायला सुरूवात

नवी दिल्ली: देशातील बहुतांश भागांमध्ये पाऊस आणि ढगाळ वातावरणामुळे तापमानात घट नोंदवली गेली. भारतीय हवामान विभागाच्या मते, देशभरात उष्णतेची लाट (हीटवेव्ह) संपली आहे. अनेक राज्यांमध्ये पाऊस आणि वादळामुळे हवामानात बदल झाला आहे. राजस्थानच्या अनेक भागांमध्ये सलग दुसऱ्या दिवशी धुळीचे वादळ आले, ज्यामुळे तापमानात घट झाली. जैसलमेरमध्ये वाळूचे वादळ आले. यामुळे दृश्यमानतेवर परिणाम झाला, मात्र कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले नाही. राज्यातील फलोदी येथे कमाल तापमान ४२.६ अंश नोंदवले गेले. उत्तर प्रदेशातील बलिया येथे ३४.४ मिमी आणि मुरादाबाद येथे २१.८ मिमी पाऊस झाला. लखनौमध्येही २.४ मिमी पाऊस झाला. येथे कमाल तापमान ३६.३ अंश होते, जे सामान्यपेक्षा ३.९ अंश कमी आहे.

# विधानपरिषदेच्या १७ जागांसाठी लढती ठरल्या !

## अनेक ठिकाणी बंडखोरी मात्र मुख्य लढत महायुती विरुद्ध महाविकास आघाडीच



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी अखेर सोमवारी उमेदवारी अर्ज भरण्यात आले असून, महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशीच थेट लढत होणार आहे. जवळपास सर्वच मतदारसंघात काही नेत्यांनी नाराजी व्यक्त करत बंडखोरी केली, तर काहींनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्याने एकाच जागेसाठी अनेक उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. ▶▶ पान २ वर

### राज्यातील १७ मतदारसंघातील प्रमुख लढती

१. सोलापूर : काँग्रेस मविआचे आदित्य फत्तेपूरकर विरुद्ध भाजप महायुतीचे राजेंद्र राऊत. २. अहिल्यानगर : काँग्रेस मविआचे करण ससाणे विरुद्ध भाजप महायुतीचे प्राजक्त तनपुरे. ३. ठाणे : राष्ट्रवादी काँग्रेस मविआचे अभिजीत पवार विरुद्ध शिवसेना महायुतीचे रविंद्र फाटक. ४. जळगाव : शिवसेना ठाकरे मविआचे शरद तायडे विरुद्ध भाजप महायुतीचे नंदकिशोर महाजन. ५. सांगली–सातारा : राष्ट्रवादी काँग्रेस मविआचे बाळासाहेब पाटील/अभयसिंह जगताप विरुद्ध भाजप धैर्यशील माने. ६. नांदेड : काँग्रेस मविआचे रामदास पाटील विरुद्ध भाजप महायुतीचे अमर राजूरकर ७. यवतमाळ : काँग्रेस मविआचे साहेबराव कांबळे विरुद्ध शिवसेना महायुतीचे दुष्यंत चतुर्वेदी. ८. पुणे : राष्ट्रवादी काँग्रेस मविआचे श्रीकांत पाटील विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे विक्रम काकडे. ९. भंडारा–गोंदिया : काँग्रेस मविआचे दिलीप बनसोड विरुद्ध भाजप महायुतीचे अविनाश ब्राह्मणकर. १०. रायगड–रत्नागिरी–सिंधुदुर्ग : शिवसेना ठाकरे गट विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे अनिकेत तटकरे. ११. नाशिक : मविआचा उमेदवार नाही, अपक्ष विरुद्ध शिवसेना महायुतीचे नरेंद्र दराडे. १२. वर्धा–चंद्रपूर–गडचिरोली : काँग्रेस मविआचे शैलेश अग्रवाल विरुद्ध भाजप महायुतीचे अरुण लखानी. १३. अमरावती : काँग्रेस मविआचे हर्षदीप देशमुख विरुद्ध भाजप महायुतीचे प्रवीण पोटे. १४. धाराशिव–लातूर–बीड : काँग्रेस मविआचेचे महेश देशमुख विरुद्ध भाजप महायुतीचे बसवराज पाटील. १५. परभणी–हिंगोली : शिवसेना मविआचे डॉ. विवेक नावंदर विरुद्ध शिवसेना महायुतीच सईद खान. १६. छत्रपती संभाजीनगर–जालना : शिवसेना ठाकरे गट विरुद्ध भाजप किंवा शिवसेना. १७. नागपूर (पोटनिवडणूक) : काँग्रेस मविआचे अतुल लोंढे विरुद्ध भाजप महायुतीचे डॉ. राजीव पोतदार.

# तांत्रिक चुका नाही विक्रेत्याच्या फायद्यासाठी परीक्षांमध्ये घोळ

**दिल्ली । वृत्तसंस्था**



लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सीबीएसईच्या निविदा प्रक्रियेत भ्रष्टाचाराचा आरोप केला आहे. त्यांनी दावा केला की, विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका स्वयंचलित रोबोटिक स्कॅनरऐवजी मोबाईल फोनने स्कॅन करण्यात आल्या. विद्यार्थी सार्थक सिद्धांतची एक पोस्ट शेअर करत राहुल गांधी यांनी म्हटले आहे की, ऑन–स्क्रीन मार्किंग सिस्टीमची निविदा ऑगस्टमध्ये पुन्हा जारी करण्यात आली होती. त्यावेळी अनेक अटी काढून टाकण्यात आल्या आणि स्कॅनिंगची गुणवत्ता ३०० डीपीआयवरून २०० डीपीआयपर्यंत कमी करण्यात आली. राहुल गांधी यांनी म्हटले आहे की, अस्पष्ट उत्तरपत्रिका, गहाळ झालेली पाने आणि अनेक प्रती स्कॅन न होणे या केवळ तांत्रिक चुका नाहीत. त्यांच्या मते, एका विशिष्ट विक्रेत्याला फायदा व्हावा यासाठी केलेल्या कराराचा हा परिणाम आहे. राहुल म्हणाले की, ही एक फसवणूक आहे. आणि ▶▶ पान २ वर

# नीट पेपरफुटीचा मास्टरमाईंड कुलकर्णीच्या बीडमधील ४ माजली घरावर पालिकेचा हातोडा

**बीड । प्रतिनिधी**




देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट पेपरफुटीप्रकरणात सीबीआयने कारवाईचा धडाका लावत महाराष्ट्रातील नाशिक, पुणे, लातूर, बीडमधून अनेकांना अटक केली आहे. याप्रकरणात पेपरफुटीचा मास्टरमाईंड असलेल्या पी.व्ही. कुलकर्णी याच्यावर प्रशासनाने तोडक–मोडक कारवाई सुरू केल्याचे दिसून येत आहे. बीड शहरातील शाहू नगर भागात सुरू असलेल्या बांधकामावर अखेर हातोडा मारण्यात आला आहे. ▶▶ पान २ वर

# कॉकरोच पार्टी आता रस्त्यावर उतरणार

## दिल्लीत आंदोलनाची तयारी सुरू, अभिजित दिपके ६ जूनला भारतात

**दिल्ली । वृत्तसंस्था**




पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत कॉकरोच जनता पार्टी या व्यंगात्मक सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचे संस्थापक अभिजित दिपके यांनी शांततापूर्ण आंदोलनाची घोषणा केली आहे. यासाठी ते ६ जून रोजी भारतात परतणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. सीजेपी च्या अधिकृत इन्स्टाग्राम हँडलवर ▶▶ पान २ वर

# 'नीट यूजी' फेरपरीक्षा संगणकीय पद्धतीने घेण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**नीट यूजी २०२६ ची फेरपरीक्षा २१ जून रोजी संगणक–आधारित चाचणी (सीबीटी) पद्धतीने घेण्याचा आदेश देण्यास सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी नकार दिला. राष्ट्रीय चाचणी संस्थेने (एनटीए) आधीच अनेक समस्यांचा सामना करत असल्याचे न्यायालयाने यावेळी नमूद केले.**

सुनावणीच्या सुरुवातीला, राजपूत यांनी स्पष्ट केले की, ते इतर कोणत्याही मागणीचा आग्रह धरत नसून, केवळ फेरपरीक्षा संगणकीय पद्धतीने घेतली जावी या एकाच मागणीवर ठाम आहेत. खंडपीठाने यावेळी नमूद केले की, यापूर्वीही अशाच स्वरूपाच्या याचिका न्यायालयाने फेटाळून लावल्या आहेत. फेरपरीक्षा संगणकीय पद्धतीने घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. ''ही फेरपरीक्षा संगणकीय पद्धतीने घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. एनटीएला आधीच अनेक समस्या भेडसावत आहेत. परीक्षा रद्द करण्यात आली होती आणि आता ती पुन्हा घेतली जात आहे. आम्ही ही याचिका एकतर आताच फेटाळून लावू, किंवा न्यायालयाच्या सुट्ट्या संपल्यानंतर, असे खंडपीठाने ▶▶ पान २ वर

# राज्यात पुढील ५ दिवस वादळी पावसाचे

## शासनाकडून अलर्ट, मॉन्सून २ दिवसात केरळमध्ये

**पुणे । प्रतिनिधी**

मॉन्सून पुढील २ दिसांमध्ये केरळसह तमिळनाडूमध्ये धडक मारण्याची शक्यता आहे. तर राज्यात पावसाला पोषक वातावरण असून राज्यात अनेक ठिकाणी गारपीटीचा अंदाज आहे. पुढील ५ दिवस काही भागात वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. शासनाने याबाबत शेतकऱ्यांना अलर्ट राहण्यासाठी मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत.



शेतकरी आतुरतेने वाट पाहत असलेल्या मॉन्सूनच्या देशातील आगमनाविषयी हवामान विभागाने महत्वाची माहिती दिली आहे. मॉन्सून पुढील २ ते ३ दिवसांमध्ये केरळ आणि तमिळनाडूमध्ये दाखल होण्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. मॉन्सून शनिवारीच देशाच्या वेशीवर आला होता. ▶▶ पान २ वर



## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०१ जून २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: १४१.५० क्विंटल** | | |
| २,२४० | २,४७१ | २,३५२ |
| **ज्वारी/हायब्रिड : २६३.०० क्विंटल** | | |
| १,९५० | ३,८०१ | २,६३४ |
| **मका/लोकल: ८.५० क्विंटल** | | |
| १,७०० | १,९७० | १,८३५ |
| **तूर : २.५० क्विंटल** | | |
| ६,५०० | ७,६०० | ७,०५० |
| **उडीद : -- क्विंटल** | | |
| -- | -- | -- |
| **बाजरी: ११६.०० क्विंटल** | | |
| २,२०१ | २,६०० | २,३७९ |
| **मुग: ८.०० क्विंटल** | | |
| ७,३१० | ७,३१० | ७,३१० |
| **सोयाबीन:१०.५० क्विंटल** | | |
| ६,२०० | ७,०५० | ६,६२५ |
| **हरभरा: २६.०० क्विंटल** | | |
| ५,५०० | ५,७५० | ५,६६२ |

# पैसे थांबविलेल्या ८० लाख लाडक्या बहिणींची पडताळणी सुरू–आदिती तटकरे

## विरोधकांच्या टिकेने सरकार बेजार

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील महायुती सरकारची सर्वांत महत्वाकांक्षी योजना असलेल्या लाडकी बहीण योजनेच्या ८० लाख लाभार्थी महिलांना मिळणारा लाभ बंद का झाला? यावर महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी मोठा खुलासा केला आहे. ई–केवायसी प्रक्रिया करुन सुद्धा ज्यांचा लाभ बंद झाला आहे. आम्ही त्याची फेरतपासणी करत आहोत. जेणेकरुन कुठलीही महिला लाभापासून वंचित राहता कामा नये, असे त्यांनी सोमवारी (दि. १ जून) स्पष्ट केले.**



राज्यातील ८० लाख लाडक्या बहिणींना अपात्र ठरवल्याबद्दल विरोधकांनी राज्य सरकारला धारेवर धरले आहे. हा मुद्दा सध्या गाजत आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री तटकरे यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे. कोणाचेही अर्ज बाद झालेले नाहीत. या योजनेच्या पात्रता निकषांपैकी वयाचे, उत्पन्नाचे निकष पूर्ण न करणाऱ्या अर्जदारांची माहिती संबंधित विभागांकडून प्राप्त झाली. तसेच, ज्या अर्जदारांच्या नावावर वाहन नोंदणी आहे अशाही अर्जदारांची माहिती आरटीओ विभागाकडून प्राप्त झाली. काही अर्जदार शासनाच्या इतर योजनांचेही लाभार्थी असल्याची बाब संबंधित विभागांकडून निदर्शनास आली. तसेच काही अर्जदारांनी विहित कालावधीत ई–केवायसी न केल्याने त्यांचा लाभ बंद झालेला आहे, असे त्यांनी सांगितले. लाडकी बहीण योजनेच्या ई–केवायसीची प्रक्रिया साधारणपणे गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात सुरु झाली होती. पहिल्यांदा तीन महिन्यांचा कालावधी दिला होता. मग कालावधी वाढवून दोन महिने दिला. त्यानंतर आणखी दोन महिने दिला. ८ ते १० महिन्यांचा कालावधी हा ई– ▶▶ पान २ वर

# पुण्यात आज कांदा प्रश्नावर सर्वपक्षीय मोर्चा

**पुणे । प्रतिनिधी**

कांदा उत्पादकांच्या विविध मागण्यांसाठी मंगळवारी (दि. २) मंचरजवळील भोरवाडी (तांबडेमळा) येथे सर्वपक्षीय मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी पुणे–नाशिक महामार्ग रोखण्याचा इशारा आयोजकांनी दिला आहे. कांद्याला प्रतिकिलो २५ रुपये हमीभाव द्यावा, जानेवारी ते मे या कालावधीत कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रतिकिलो १५ ते २० रुपये अनुदान द्यावे, नाफेडमार्फत १० लाख टन कांदा खरेदी करून त्याची निर्यात करावी, कांदा निर्यात कायमस्वरूपी सुरू ठेवावी, तसेच वीज भारनियमन रद्द करावे, अशा प्रमुख मागण्या मोर्चाच्या माध्यमातून करण्यात येणार आहेत. या मोर्चात विविध राजकीय पक्षांचे नेते सहभागी होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, शिवसेनेचे उपनेते आमदार सचिन अहीर, खासदार अमोल कोल्हे, खासदार नीलेश लंके, खेडचे आमदार बाबाजी काळे, जुन्नरचे आमदार शरद सोनवणे, ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# दुष्काळाचे सावट आणि अर्थव्यवस्थेची कसोटी

देशाची अर्थव्यवस्था सध्या अनेक आघाड्यांवर गंभीर आव्हानांना सामोरी जात आहे. इंधनाचा वाढता तुटवडा, पेट्रोल-डिझेलच्या सतत वाढणाऱ्या किमती, महागाईचा भडका, रुपयाचे होत असलेले अवमूल्यन, परकीय चलनसाठ्यातील घट आणि जागतिक आर्थिक अनिश्चितता यामुळे सामान्य नागरिकांपासून उद्योगजगतापर्यंत सर्वच घटक चिंतेत आहेत. अशा परिस्थितीत भारतीय हवामान विभागाने यंदाच्या मान्सूनबाबत व्यक्त केलेला सुधारित अंदाज हा संकटात आणखी भर घालणारा ठरत आहे. कृषिप्रधान भारतासाठी मान्सून हा केवळ ऋतू नसून अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे पावसाच्या कमतरतेचा इशारा हा केवळ हवामानाचा विषय नसून तो राष्ट्रीय आर्थिक आणि सामाजिक चिंतेचा मुद्दा आहे.

हवामान विभागाने सुरुवातीला देशात सरासरीच्या ९२ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त केला होता. मात्र, प्रशांत महासागरातील 'एल निनो'च्या प्रभावामुळे परिस्थिती बदलत असून पावसाच्या वितरणात मोठी तफावत निर्माण होण्याची शक्यता आहे. जून ते सप्टेंबर हा देशातील प्रमुख पावसाळी हंगाम मानला जातो. यामध्ये जून महिना आणि जुलैचा पहिला पंधरवडा हा खरीप पेरण्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. पण याच काळात महाराष्ट्र, गोवा, कर्नाटकसह अनेक राज्यांमध्ये पावसाची तूट राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे पेरण्या लांबणीवर पडण्याचा आणि उत्पादन घटण्याचा धोका वाढला आहे. देशातील अनेक भागांमध्ये गेल्या काही वर्षांपासून हवामानातील अनियमितता वाढत आहे. कधी अतिवृष्टी, कधी अवकाळी पाऊस, तर कधी दीर्घकाळ पावसाचा खंड अशा परिस्थितीमुळे शेतकऱ्यांना दुबार आणि तिबार पेरण्या कराव्या लागत आहेत. यामुळे उत्पादन खर्च वाढत असून उत्पन्न मात्र घटत आहे. आधीच कर्जबाजारी असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही परिस्थिती अधिकच गंभीर बनू शकते. यंदा जर पावसाने ओढ दिली, तर अन्नधान्य उत्पादनात घट होऊन त्याचा परिणाम बाजारभावांवर आणि महागाईवर होणार हे निश्चित आहे. विशेष चिंतेची बाब म्हणजे देशातील मान्सून प्रवण क्षेत्रांमध्येही सरासरीच्या ९४ टक्के पावसाचीच शक्यता वर्तविण्यात आली आहे. म्हणजेच ज्या भागांमध्ये सामान्यतः मुबलक पाऊस पडतो, तेथेदेखील यंदा परिस्थिती समाधानकारक राहील, याची खात्री देता येत नाही. कृषी उत्पादन घटल्यास त्याचा परिणाम केवळ शेतकऱ्यांवरच नव्हे, तर संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होईल. अन्नधान्याच्या किमती वाढतील, ग्रामीण भागातील खरेदीशक्ती कमी होईल आणि उद्योग-व्यवसायांवरही त्याचे दूरगामी परिणाम दिसून येतील.

याहूनही गंभीर बाब म्हणजे देशातील जलस्रोतांची सद्यस्थिती. मागील वर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्यानंतरही अनेक धरणांमधील पाणीसाठा चिंताजनक पातळीवर पोहोचला आहे. अनेक शहरांमध्ये आणि गावांमध्ये पाणीपुरवठ्यावर निर्बंध आले आहेत. काही ठिकाणी एक-दोन दिवसाआड, तर काही ठिकाणी आठवड्यातून एक-दोन वेळाच नळांना पाणी येत आहे. त्यामुळे टँकरवरील अवलंबित्व वाढले आहे. परंतु डिझेलच्या वाढत्या किमती आणि उपलब्धतेच्या समस्येमुळे टँकर व्यवस्थादेखील तणावाखाली आहे. पावसाचा उशीर झाला किंवा पावसात मोठी तूट राहिली, तर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिकच गंभीर होऊ शकतो.

यंदा नैऋत्य मोसमी वाऱ्यांचे अंदमानात आगमन नेहमीपेक्षा लवकर झाले होते. त्यामुळे मान्सून केरळमध्येही वेळेआधी दाखल होईल, अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात मान्सूनच्या प्रगतीने अपेक्षित वेग घेतलेला दिसत नाही. त्यामुळे पुढील काही आठवड्यांतील हवामानाची स्थिती अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. शेतकरी, व्यापारी, उद्योगक्षेत्र आणि सामान्य नागरिकांचे लक्ष आता मान्सूनच्या वाटचालीकडे लागले आहे. भारतातील सुमारे ६० टक्के लोकसंख्या आजही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. शेती, दुग्धव्यवसाय, पशुपालन, अन्नप्रक्रिया उद्योग, ग्रामीण बाजारपेठा आणि वाहतूक क्षेत्र या सर्वांची घडी मान्सूनवर अवलंबून असते. त्यामुळे मान्सून अपयशी ठरल्यास त्याचे पडसाद संपूर्ण अर्थव्यवस्थेत उमटतात. त्यातच जागतिक स्तरावरील आर्थिक मंदीची शक्यता, वाढते इंधनदर आणि महागाईचा दबाव यामुळे परिस्थिती आणखी गुंतागुंतीची बनत आहे. अशा वेळी शासन, प्रशासन आणि नागरिक या सर्वांनीच दुष्काळी परिस्थिती गृहीत धरून नियोजन करण्याची गरज आहे. जलसंधारण, पावसाच्या पाण्याचे संकलन, पाणी पुनर्वापर, सूक्ष्म सिंचन पद्धतींचा प्रसार आणि पिकांच्या योग्य नियोजनाला प्राधान्य द्यावे लागेल. ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती आणि शेतकऱ्यांना आवश्यक आर्थिक मदत यांचीही तितकीच आवश्यकता असेल. पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविणे आणि उपलब्ध संसाधनांचा काटकसरीने वापर करणे ही काळाची गरज बनली आहे.

येत्या काही महिन्यांत मान्सूनची स्थिती आणि त्यानुसार घेतले जाणारे निर्णय देशाच्या आर्थिक भवितव्यावर मोठा प्रभाव टाकणार आहेत. संकटाचे स्वरूप मोठे असले, तरी योग्य नियोजन, प्रभावी प्रशासन आणि जनसहभाग यांच्या बळावर त्याचा सामना करणे शक्य आहे. मात्र त्यासाठी आजपासूनच सज्ज होणे आवश्यक आहे. अन्यथा दुष्काळ, महागाई आणि आर्थिक मंदी या तिहेरी संकटाचा फटका देशाला बसण्याची भीती नाकारता येणार नाही.

# ८१ लाख महिलांना वगळले बहिणींनो सरकारवर ४२० चा गुन्हा दाखल करा-प्रा.सुशीलाताई मोराळे

**बीड । प्रतिनिधी**

ऐन निवडणुकीच्या तोंडावर महाराष्ट्र सरकारने मतपेटीवर कब्जा करण्यासाठी लाडक्या बहिणीच्या बँक खात्यात पैसे टाकून अक्षरशः मताची लूट केली, कुठलाही नियम अटी न घालता हे अत्यंत चुकीचे काम केले आता राज्याच्या तिजोरीचे दिवाळे निघाल्यावर कर्मचाऱ्यांचे पगार द्यायला पैसे नाहीत ही नाचक्की व्हायला लागली आणि आता सरकारला जागा आली त्यामुळे ८१ लाख लाडक्या बहिणींना वगळण्यात आले यापूर्वीही ५० लाख लाडक्या बहिणींना वगळले सरकारने केवायसी मोहीम तयार केली आता एक कोटी ६६ लाख महिलाच पात्र ठरवल्या प्रारंभी ही योजना जाहीर झाली तेव्हा २ कोटी ४७ लाख महिला लाभार्थी होत्या ८१ लाख बहिणींना वगळले आहे. बहिणींनो तुम्ही फक्त १५०० रुपयासाठी स्वतःचे मूल्यवान मत भाजपाला शिंदे सेनेला व राष्ट्रवादी अजित पवार पक्षाला देऊन स्वतःचे मत विकले आता या सरकारवर फसवणुकीचा ४२० चा गुन्हा दाखल करा असे आवाहन लोकनेत्या प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केले आहे.

या योजनेवर राज्य सरकारने २०२४ - २०२५ मध्ये ३२ हजार ४७० कोटी रुपये खर्च केले. २०२५-२०२६ ला ३० हजार कोटी खर्च केले दुसऱ्या वर्षी दोन कोटी कमी खर्च झाला कारण ५० लाख महिलांना सरकारने बोगस नोंदी म्हणून वगळले होते. या योजनेचा लाभ ज्या स्त्रियांचे पती सरकारी कर्मचारी आहेत अशा महिलांनी घेतला हे कारण दाखवून वगळण्यात आले. याशिवाय ज्यांचे वय ६५ वर्ष होते टप्प्याटप्प्याने दर महिन्याला १० हजार स्त्रियांना बाद केले जाते आता ज्या कर्मचाऱ्यांच्या पत्नीनी लाभ घेतला असे १५००० पेक्षा जास्त लाभार्थी वर कार्यवाही म्हणजे सरकारचे काम वराती मागून घोडे असेच म्हणावे लागेल. फक्त लाडक्या बहिणीच्या मतावर डल्ला मारून सरकार सत्तेत आले या सरकारने राजीनामा द्यावा किंवा राष्ट्रपती ने हे सरकार बरखास्त करावे अशी मागणी प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केली आहे.

# कारजळीतप्रकरणी खून केलेला मृतदेह गाडीत?

**गणेश नवपुते । जालना**

**जाफराबाद-चिखली रोडवरील कार जळीत प्रकरणाचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. खूनचा उलगडा पोलिसांनी केला!**

जाफराबाद पोलिसांचा मोठा खुलासा; कार जळीत प्रकरणात खुनाचा कट उघडकीस! दि. ३१ मे २०२६ रोजी जाफराबाद-चिखली मार्गावर अल्टो कारला आग लागून त्यातील व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. सुरुवातीला हा अपघात असल्याचे मानले जात होते. मात्र जाफराबाद पोलिसांनी अवघ्या काही तासांत तपासाची चक्रे फिरवत या प्रकरणाचा धक्कादायक उलगडा केला आहे. मृत्यू झालेली व्यक्ती नितीन प्रभाकर गवळी असल्याचा बनाव करण्यात आल्याचे समोर आले असून, संदीप चौहान याचा खून करून मृतदेह कारमध्ये टाकण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. विम्याची रक्कम, कर्जे आणि वैयक्तिक कारणांमुळे हा कट रचल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून मुख्य सूत्रधाराच्या शोधासाठी पोलीस पथक रवाना झाले आहे. मृत व्यक्तीची ओळख निश्चित करण्यासाठी डीएनए तपासणी सुरू आहे. जाफराबाद पोलिसांच्या वेगवान व कौशल्यपूर्ण तपासामुळे कथित अपघातामागील खुनाचे गूढ उलगडले केला.



# चनई येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**चनई येथे लोकमाता, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला व उपस्थितांनी त्यांना विनम्र अभिवादन केले.**

यावेळी गावच्या सरपंच रोहिणी सावरे, उपसरपंच अनिल शिंदे, ग्रामसेवक देशमुख साहेब, बार्टीचे समतादूत व्यंकटेश जोशी यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या न्यायप्रियता, लोककल्याणकारी दृष्टीकोन आणि आदर्श प्रशासनाचा वारसा समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. वक्त्यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी प्रजाहिताला सर्वोच्च स्थान देत पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श निर्माण केला. समाजहित, धर्मकार्य आणि जनसेवेच्या माध्यमातून त्यांनी इतिहासात अजरामर स्थान मिळविले असून त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी आहे. कार्यक्रमास गावातील महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शविली. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# कृत्रिम बुद्धिमत्ता, मानवी संवेदना आणि पारंपरिक ज्ञानाच्या समन्वयातून पशुपालनात भरभराट आणा

## एकात्मिक दुग्धव्यवसाय विकास उपक्रमाचे पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या उद्घाटन

**मुंबई । प्रतिनिधी**

**कृत्रिम बुद्धिमत्ता, मानवी संवेदना आणि पारंपरिक ज्ञानाच्या समन्वयातून राज्यात पशुपालन व्यवसायाला भरभराटी आणावी, असे आवाहन पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी केले आहे. 'कारगिल' कंपनीने 'सिजेंटा फाउंडेशन इंडिया' आणि 'डिजिटल ग्रीन इंडिया' यांच्या भागीदारीत महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यात 'एकात्मिक दुग्धव्यवसाय विकास उपक्रम' सुरू केला आहे. या उपक्रमाच्या मंत्रालयात आयोजित उद्घाटन कार्यक्रमात मंत्री श्रीमती मुंडे बोलत होत्या.**



याप्रसंगी विभागाचे सचिव एन. रामास्वामी, कारगिल इंडियाचे अध्यक्ष आणि कारगिल ॲनिमल न्यूट्रिशन अँड हेल्थचे वरिष्ठ व्यवस्थापकीय संचालक रविंदर बलाईन,डिजिटल ग्रीन इंडियाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी निधी भसीन आणि सिनजेंटा फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम बोराडे आदी उपस्थित होते . तर अहिल्यानगर जिल्ह्यातून पशुपालक शेतकरी आणि इतर भागीदार ऑनलाईन पद्धतीने जोडले गेले होते.मंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या, शासनाचा नेहमीच ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करण्यावर आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यावर भर राहिला आहे. पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय हा आपल्या ग्रामीण जीवनमानाचा मुख्य कणा आहे. कारगिल, सिजेंटा फाउंडेशन आणि डिजिटल ग्रीन यांचा हा संयुक्त उपक्रम आमच्या 'विकसित महाराष्ट्र' आणि 'विकसित भारत' या संकल्पनेला गती देणारा ठरेल. तंत्रज्ञान, 'फार्मरचॅट' सारखे कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित डिजिटल मार्गदर्शन आणि थेट दारात पोहोचणारी 'पशु आरोग्य मित्र' फिरती पशुवैद्यकीय सेवा यांच्या माध्यमातून अहिल्यानगरमधील हजारो शेतकऱ्यांना थेट फायदा होईल. 'पशु सखी'च्या माध्यमातून महिलांचा वाढणारा सहभाग ग्रामीण महिला सक्षमीकरणाला नवी दिशा देईल. हा पथदर्शी प्रकल्प संपूर्ण राज्यासाठी एक आदर्श मॉडेल ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

अहिल्यानगरमधील राहुरी, राहता आणि श्रीरामपूर तालुक्यातील २६ गावांमधील ३ हजारहून अधिक शेतकऱ्यांपर्यंत 'पशु आरोग्य मित्र' (मोबाईल व्हेटर्नरी व्हॅन) च्या माध्यमातून पशुवैद्यकीय सेवा पोहोचवली जात आहे. याशिवाय, १२० गावांधील ५ हजार शेतकऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित डिजिटल सल्ला सेवा आणि क्षमता बांधणीचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत दोन फिरते पशुवैद्यकीय दवाखाने उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या वाहनांमध्ये आधुनिक निदान साधने, औषधे आणि लसींसाठी कोल्ड-चेन सुविधा उपलब्ध असेल. यामुळे थेट शेतकऱ्यांच्या दारात वेळेवर उपचार मिळून जनावरांचा मृत्यूदर कमी होण्यास मदत होणार आहे. 'डिजिटल ग्रीन' द्वारे 'पशु सखी' आणि पॅरा-व्हेट्सना मास्टर ट्रेनर म्हणून प्रशिक्षित केले जाईल, जे गावोगावी जाऊन पशु पोषण, वासरांची काळजी, स्वच्छता आणि दुग्ध व्यवस्थापनाचे धडे देतील. शेतकऱ्यांसाठी फार्मरचॅट हे एआय-संचलित, आवाज आधारित प्लॅटफॉर्म सुरू करण्यात आले आहे, जे स्थानिक भाषेत जनावरांचे आजार आणि सरकारी योजनांची माहिती दिली जाईल, अशी माहिती यावेळी संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिली. कारगिल इंडियाचे अध्यक्ष आणि कारगिल ॲनिमल न्यूट्रिशन अँड हेल्थचे वरिष्ठ व्यवस्थापकीय संचालक रविंदर बलाईन म्हणाले, महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेशी पशुसंवर्धन जोडलेले आहे. कारगिल गेल्या अनेक वर्षांपासून येथील शेतकऱ्यांसोबत काम करत असून, या नव्या उपक्रमामुळे दुग्धव्यवसाय परिसंस्था अधिक मजबूत होईल. डिजिटल ग्रीन इंडियाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी निधी भसीन आणि सिनजेंटा फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम बोराडे यांनीही या भागीदारीबद्दल आनंद व्यक्त करत, हा प्रकल्प शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी आणि हवामान-अनुकूल शेतीला चालना देण्यासाठी सहाय्यकारी ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

# पान १ वरून...

पान १ वरून...

### कर्जमाफीचा लाभ घेण्यासाठी

दाखला तयार करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. परगावी वास्तव्यास असलेल्या लाभार्थ्यांच्या नातेवाईकांशी संपर्क साधून फार्मर आयडी तयार करण्याची प्रक्रियाही पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कृषी विभागाने स्पष्ट केले आहे की, ज्या शेतकऱ्यांनी अद्याप फार्मर आयडी काढलेला नाही त्यांनी तातडीने जवळच्या महा ई-सेवा केंद्रात जाऊन नोंदणी पूर्ण करावी. कोणतीही अडचण आल्यास ग्राम महसूल अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी किंवा ग्रामपंचायत अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. वनपट्टाधारक शेतकऱ्यांनी मंजूर वनदाव्याच्या आधारे फार्मर आयडी तयार करून घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना शेतीविषयक सेवा, सुविधा आणि विविध शासकीय योजनांचा लाभ पारदर्शकपणे मिळावा यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून 'ॲग्रीस्टॅक' हा डिजिटल प्लॅटफॉर्म विकसित करण्यात आला आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना स्वस्त कर्ज, दर्जेदार कृषी निविष्ठा, विपणन सुविधा तसेच स्थानिक आणि तज्ज्ञ मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे. कृषी, महसूल, ग्रामविकास आणि सहकार विभागांनी समन्वयाने अभियान राबवून विहित मुदतीत सर्व नोंदी पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---------

### तांत्रिक चुका नाही विक्रेत्याच्या

ज्या प्रत्येक विद्यार्थ्याचे गुण चुकीच्या पद्धतीने मोजले गेले आहेत, तो या फसवणुकीचा बळी आहे. धर्मेंद्र प्रधान आपल्या पदावर कायम आहेत. मोदींचे मौन आता केवळ उदासीनता राहिलेली नाही; ते या गुन्ह्यातील त्यांच्या सहभागाचे द्योतक आहे. जेव्हा शिक्षणाला सेवेऐवजी धंद्यात बदलले जाते, तेव्हा चुका सुधारल्या जात नाहीत. त्या अधिकच वाढतात आणि याची अंतिम किंमत आपली मुले मोजत आहेत: आपला वेळ, आत्मविश्वास आणि भविष्य गमावून. विद्यार्थी सिद्धांत कुमारने कथितरित्या स्कॅन केलेल्या प्रतींचे फोटो शेअर केले. त्याने लिहिले, ''सीबीएसई, तुम्ही म्हणालात की या प्रती स्कॅन करण्यासाठी तुम्ही स्कॅनर वापरले. आता या प्रती सार्वजनिक पाहण्यासाठी उपलब्ध झाल्या आहेत, तर कृपया स्पष्ट कराल का की स्कॅन केल्यावर कोणत्या प्रतींना ड्रॉप शॅडो आली आहे? आणि या तीन घड्या कशा पडल्या?'' राहुल गांधी यांनी उत्तरपत्रिका तपासणी आणि पुनर्मूल्यांकनासाठी आकारल्या जाणाऱ्या शुल्काबाबत केंद्र सरकार आणि सीबीएसई बोर्डावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी एक्स पोस्टवर लिहिले की, ''खिसेकापूंपासून सावध रहा - आज तो सीबीएसईच्या आत बसला आहे.'' सीबीएसईच्या चुकीमुळे तुमचे गुण चुकले तर तुम्हाला काय मिळते? एका मुलाला एका बिलासाठी, एका बरोबर उत्तरपत्रिकेसाठी २,००० पर्यंत पैसे द्यावे लागू शकतात. कल्पना करा, जेव्हा ४००,००० विद्यार्थ्यांनी असे अर्ज सादर केले आहेत, तेव्हा किती कमाई करत असेल. जेव्हा फोनवरून स्कॅनिंग केले जाते, तेव्हा चुकीचे मार्किंग अटळ असते. आणि ते दुरुस्त करून घेण्याचा खर्च ते मुले भरत आहेत. ची चूक. मुलांना शिक्षा आणि सरकारची कमाई.

---------

### विधानपरिषदेच्या १७ जागांसाठी

मात्र, प्रमुख लढत ही महायुतीचे उमेदवार विरुद्ध महाविकास आघाडीचे उमेदवार यांच्यातच होणार आहे. सोलापूर ते संभाजीनगर आणि जळगाव ते नागपूरपर्यंत एकूण १७ मतदारसंघातील उमेदवारांची नावे आता समोर आली असून कोणत्या मतदारसंघात कोण प्रमुख उमेदवार आहेत आणि कोण बाजी मारणार याची चर्चा राज्यभर सुरू झाली आहे. महायुतीमध्ये भाजप ११ जागांवर निवडणूक लढवत असून शिंदेंची शिवसेना ४ जागांवर मैदानात आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेसला जागावाटपात २ जागा मिळाल्या आहेत. दुसरीकडे महाविकास आघाडीचा विचार केल्यास, काँग्रेस सर्वाधिक ८ जागांवर निवडणूक लढवत आहे, ठाकरेंची शिवसेना ६ जागांवर उमेदवार दिले असून शरद पवारांच्या राष्ट्रवादीने तीन मतदारसंघात उमेदवार दिले आहेत. त्यामुळे, या सर्व जागांवरील प्रमुख लढती आता निश्चित झाल्या असल्या तरी खरे चित्र ४ जून रोजीच स्पष्ट होणार आहे. दरम्यान, सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजीनगर-जालना आणि नागपूर (पोटनिवडणूक) होत आहे.

--------------

### कॉकरोच पार्टी आता

प्रसिद्ध करण्यात आलेल्या व्हिडिओमध्ये दिपके यांनी देशभरातील विद्यार्थी, पालक आणि नागरिकांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. भारतीय राज्यघटनेच्या मार्गाने शांततापूर्ण पद्धतीने आपला आवाज उठवण्याची वेळ आली आहे. आपण सर्वांनी एकत्र येऊन धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली, तर सरकारला आपला आवाज ऐकावा लागेल, असे त्यांनी म्हटले आहे. दिपके यांनी सांगितले की, ते ६ जून रोजी सकाळी दिल्लीत दाखल होतील. त्यानंतर समर्थकांसह संसद मार्ग पोलीस ठाण्यात जाऊन जंतर-मंतर येथे शांततापूर्ण आंदोलनासाठी परवानगी मागण्यात येणार आहे. दिपके यांनी निट पेपरफुटी प्रकरणाचा उल्लेख करत लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ झाल्याचा आरोप केला. विविध परीक्षांमधील एक कोटीहून अधिक विद्यार्थ्यांचे भविष्य अनिश्चिततेत ढकलले गेले आहे. विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता आहे. या परिस्थितीची जबाबदारी कोणीतरी स्वीकारली पाहिजे, असे ते म्हणाले. त्यांनी दावा केला की, धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू करण्यात आलेल्या ऑनलाइन याचिकेला सुमारे ८ लाख विद्यार्थ्यांनी पाठिंबा दिला आहे. तसेच सोशल मीडियावर कोट्यावधी लोकांनी या मोहिमेला समर्थन दिल्याचेही त्यांनी सांगितले. दिपके यांच्या मते, लखनऊ, जयपूर, महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांमध्ये या मुद्द्यावर आंदोलन सुरू असून, विद्यार्थी आणि पालकांमध्ये नाराजी वाढत आहे. मात्र, सरकार या मागण्यांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

---------

### राज्यात पुढील ५ दिवस

पण सलग दुसऱ्या दिवशी मॉन्सूनने त्याच जागेवर मुक्काम केला. पण मॉन्सूनच्या वाटचालीसाठी पोषक हवामान आहे. त्यामुळे पुढील २ ते ३ दिवसांमध्ये मॉन्सून केरळसह तमिळनाडूनच्या काही भागात प्रगती करण्यास पोषक हवामान आहे. तसेच मॉन्सून ऑग्रेय आणि नैऋत्य अरबी समुद्राचा काही भाग, लक्षद्वीप बेटे, बंगालच्या उपसागराचा आणखी काही भाग व्यापण्याचीही शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. पुढील ५ दिवस राज्यातील काही भागात वादळी पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. राज्यातील जालना, छत्रपती संभाजीनगर, पुणे, नाशिक, नंदूरबार, धुळे जिल्ह्यात वादळी पावसासह काही भागात गारपीटीचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तर चंद्रपूर आणि गोंदीया जिल्ह्यात वादळी पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. तर राज्यभरात वादळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. विदर्भातील बुलडाणा, अकोला आणि वाशिम जिल्ह्यात अंशतः ढगाळ वातावरणाची शक्यता आहे. हे तीन जिल्हे वगळून इतर जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी वादळी पावसाला पोषक हवामान असल्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. बुधवारी आणि गुरुवारी वर्धा, गडचिरोली, चंद्रपूर आणि नागपूर जिल्ह्यात वादळी पावसाचा अंदाज आहे. तर गोंदीया, भंडारा, अमरावती जिल्ह्यात काही ठिकाणी वादळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मराठवड्यातील धाराशिव, लातूर, नांदेड, हिंगोली, बीड, परभणी, जालना आणि छत्रपती संभाजीगर नगर जिल्ह्यात पुढील ५ दिवस काही भागात हलक्या ते वादळी पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्रातील सोलापूर, जळगाव, अहिल्यानगर आणि सांगली जिल्ह्यात पुढील ५ दिवस हलक्या तर सातारा, पुणे, नाशिक, नंदूरबार आणि धुळे जिल्ह्यात पुढील ५ दिवस वादळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. कोकणातील सिंधुदूर्ग, रत्नागिरी, रायगड, पालघर, ठाणे आणि मुंबई जिल्ह्यातही पुढील ५ दिवस वादळी पावसाला पोषक हवामान असल्याचा अंदाजही हवामान विभागाने दिला आहे.

-------------

### 'नीट यूजी' फेरपरीक्षा संगणकीय पद्धतीने

याचिकाकर्त्यांच्या वतीने बाजू मांडणारे वकील सत्यम सिंह राजपूत यांना सांगितले. न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती अरविंद कुमार यांच्या खंडपीठाने, राजदचे खासदार सुधाकर सिंह आणि इतरांनी दाखल केलेल्या या याचिकेवरील पुढील सुनावणी २७ जुलै रोजी होणार असल्याचे सांगितले.

-------------

### पुण्यात आज कांदा

आमदार रोहित पवार आणि देवदत्त निकम उपस्थित राहणार आहेत.

-----------

### पैसे थांबविलेल्या ८० लाख लाडक्या

केवायसीसाठी दिला होता. ही ई-केवायसी प्रक्रिया केवळ लाडकी बहीण योजनेमध्ये नाही, तर ज्या राज्याच्या थेट बँक हस्तांतरण योजना (डीबीटी) आहेत; या संर्वांमध्ये ही प्रक्रिया केली जाते. हा ८० लाखांचा आकडा केवळ ई-केवायसीचा नाही. यात अशा काही महिला आहेत; ज्यांनी ई-केवायसी केलेली नसेल. तसेच ज्यांचे उत्पन्न अडीच लाखांपेक्षा जास्त आहे, अशी आकडेवारी मागितली होती. अशाप्रकारचे १२ लाख लाभार्थी आहेत. ज्यांचा ८० लाखांमध्ये समावेश आहे. यात साडेचार- पावणेपाच लाख महिला अशा आहेत; ज्या ६५ वयोगटाच्या पुढे गेल्या आहेत. जो वयाचा निकष आहे, असे तटकरे म्हणाल्या. काही लाभार्थी महिलांनी विनंती केली आहे की, त्यांनी ई-केवायसी करुन सुद्धा त्यांना लाभ हा बंद झालेला आहे. आम्ही त्याची फेरतपासणी करत आहोत. जेणेकरुन ई-केवायसी प्रक्रिया केलेली लाभार्थी लाभापासून वंचित राहता कामा नये. काही महिला संजय गांधी निराधार योजना आणि लाडकी बहीण योजना अशा दोन्हींचा लाभ घेत होते. त्यांची नावे छाननीत कमी झालेली आहेत. त्यांना दोन्हीपैकी एका योजनेचा लाभ देणार आहोत. ८० लाखांमधील जवळपास तीन ते सव्वा तीन लाख असे लाभार्थी आहेत; ज्यांच्याकडे वाहने आहेत. पण ते लाभ घेत होते. याची आकडेवारी मिळाली असल्याचे त्यांनी नमूद केले.

cmyk
दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार, दि. ०२ जून २०२६


## थोडक्यात



### अंजनवती येथे अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

बीड तालुक्यातील अंजनवती येथे सार्वजनिक राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती संपूर्ण गावकऱ्यांच्यावतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली याप्रसंगी मातेच्या प्रतिमेचे पूजन करून गावकऱ्यांनी त्यांच्या पवित्र विचारांना आदरांजली वाहिली यावेळी शिवशक्ती भीमशक्ती विचार मंचाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांनी अहिल्यादेवींच्या महान कार्याविषयी व राज्यकारभाराविषयी गौरपर विचार व्यक्त केले यावेळी गावातील सर्व समाज घटकातील जागृत नागरिक हजर होते यात नारायण वामनराव येडे चेअरमन,ईश्वर नाना येडे सर व दत्ता त्रिंबक येडे,पांडूकाका येडे,रामेश्वर काटवटे हे ग्रामपंचायत सदस्य सोबतच बाजीराव भूमकर,लहूशेठ करडूले, दत्ता सुदामराव येडे,कुंडलिक चव्हाण,अर्जुन बापू येडे,बापूराव गव्हाणे,कृष्णा शिंदे,अतुल सोनवणे,दत्ता थोरात,विलास मोरे,भगवान येडे,भारत बबनराव येडे,सुनील फाटक,गणेश जोशी,रामहरी अच्युतराव येडे,संतोष भोगल, नितीन पाटील,सखाराम सगळे,प्रल्हाद येडे, नितीन गायकवाड,कल्याणभाऊ येडे,अविनाश येडे गुड्डू भाई यांच्यासह मावळ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती !!

### युवा शेतकरी झाला साहेब; रितेश राऊत यांची मुंबई पोलीसपदी निवड



वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कवडगाव येथील रहिवाशी शेतामध्ये राब राब काम करणारा वडिलांचे छत्र लहानपणीच हरवले असताना आपल्या आई व भावासोबत शेतामध्ये रात्रंदिवस काम करणारा युवा शेतकरी रितेश रोहिदास राऊत हा युवक बारावी उत्तीर्ण झाल्यापासून पोलीस होण्याचे स्वप्न उराशी धरून गेल्या अनेक वर्षापासून पोलीस भरती होण्यासाठी प्रयत्न करत होता अखेर त्याचे हे स्वप्न सत्यामध्ये उतरले असून नुकतीच मुंबई पोलीस पदाची अंतिम निवड यादी आली असून यामध्ये या तरुणाची मुंबई पोलीस पदी निवड झाली आहे.

यामुळे रितेश राऊत यांचे सर्व स्थरातून कौतुक व अभिनंदन केले जात आहे. त्यांनी केलेले अथंग प्रयत्न व जिद्दीला सलाम कारण आपल्या कुटुंबाचा गाडा हा शेतीवरच अवलंबून होता त्यांनी शेती करूनच आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह केला आणि शेतीमध्येच रात्र दिवस काम करून पोलीस भरतीची प्रॅक्टिस केली प्रत्येक वर्षी पोलीस भरतीसाठी प्रयत्न करायचे पण यश मिळाले नाही अपयशाची परवा न करता प्रत्येक वर्षी पोलीस भरतीसाठी प्रयत्न करत राहिले शेतामध्ये काम करून अभ्यास व प्रॅक्टिस करत स्वतःच्या मेहनतीने जिद्दीने अखेर त्यांचे पोलीस होण्याचे स्वप्न सत्यात उतरले असुन त्यांची मुंबई पोलीस पदी निवड झाली आहे. यामुळे कवडगाव नगरी मध्ये आणखी एक मानाचा तुरा रवला आहे. कवडगाव येथील नागरिकांनी त्यांची भव्य दिव्य अशी मिरवणूक काढत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमास पोलीस खात्यातील माजी अधिकारी कर्मचारी गावचे सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य शिक्षक पत्रकार युवकानसह ज्येष्ठ नागरिक या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्यावर सर्वच स्थरातून कौतुक करत शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

# पार्किंगचे नियम धाब्यावर बसवणाऱ्या बेशिस्त ऑटोरिक्षांना वाहतूक पोलीसांचा दणका

बीड । प्रतिनिधी

शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत व नियमामध्ये राहण्यासाठी प्रभारी पोलीस अधिक्षक चेतना तिडके मॅडम यांच्या आदेशावरुन दि.२६ मे २०२६ मंगळवार दुपारी ४ ते सायं.६ च्या दरम्यान जिल्हा वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील आणि जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हवालदार सखाराम घोलप, पोलीस अंमलदार संतोष मोरे, राहुल घाडगे, मोहन बन्सोडे, चेतन दहातोंडे, चालक पोलीस हवालदार हारके, नारायण वाघमारे या पोलीस कर्मचाऱ्यांनी शहरातील महत्वपुर्ण बाजारपेठेच्या ठिकाणी ऑटोरिक्षाचालकांवर कारवाई केली.

शहरातील वाहतूक शिस्त मोडणाऱ्या आणि नियमांना हरताळ फासणाऱ्या ॲटोरिक्षांविरोधात जिल्हा वाहतुक पोलीसांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. विशेष तपासणी मोहिमेदरम्यान तब्बल २१ ऑटोरिक्षाचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.



सदरील कारवाई ही जालना रोडवरील वंदना हॉटेलसमोर, अण्णाभाऊ साठे चौक, सांगली बँक कॉर्नर, सुभाष रोड, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक या भागात करण्यात आली यावेळी जिल्हा वाहतूक पोलीसांच्या अवैध पार्किंग, रस्त्यावर अडथळा करणे, वाहतूक नियमांचे उल्लंघन, कागदपत्रांची त्रुटी आढळून आल्याने २१ रिक्षाचालकांवर कारवाई करण्यात आली यावेळी १० हजार रुपयांचा दंड रिक्षाचालकांकडून वसूल करण्यात आला. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी अशा मोहिमा यापुढेही सुरुच राहतील असे जिल्हा वाहतूक पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी म्हणले आहे.

### नियम मोडणाऱ्या कोणत्याही वाहनधारकाला यापुढे सुट दिली जाणार नाही -वैभव पाटील

वाहनांची कागदपत्रे, विमा, ड्रायव्हींग लायसन्स, प्रवासांची मर्यादा, पीयुसी अशा नियमांची पुर्तता करावी तसेच वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षाचालकांना तसेच इतर वाहनधारकांना यापुढे कोणतीही सुट दिली जाणार नाही अशी माहिती जिल्हा वाहतूक पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी सांगितले आहे.

## केजमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण

केज । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या मन की बात या लोकप्रिय रेडिओ कार्यक्रमाचे आज, रविवार दिनांक ३१ मे २०२६ रोजी केज येथे जाहीर प्रक्षेपण करण्यात आले. या कार्यक्रमाला केजमधील विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित नागरिक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पंतप्रधानांचे विचार ऐकले.या प्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती व ज्येष्ठ नेते डॉ. वासुदेव नेहरकर, माजी जिल्हा परिषद सदस्या डॉ. योगिनी थोरात आणि तालुका अध्यक्ष भगवान केदार यांची प्रमुख उपस्थिती होती.

आजच्या मन की बात मधील प्रमुख मुद्दे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आजच्या भागात देशवासीयांशी संवाद साधताना उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर देशातील पाण्याचे संकट दूर करण्यासाठी प्रत्येकाने कॅच द रेन मोहिमेत सहभागी व्हावे आणि पाण्याचा अपव्यय टाळावा, असे आवाहन पंतप्रधानांनी केले.



भारतीय कारागीर आणि स्थानिक उद्योगांना बळ देण्यासाठी देशवासीयांनी स्वदेशी वस्तूंचा वापर वाढवावा, ज्यामुळे आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार होईल.युवाशक्ती आणि नाविन्यपूर्ण संकल्पना देशातील तरुण नवनवीन स्टार्टअप्सच्या माध्यमातून जागतिक स्तरावर भारताचे नाव उंचावत असल्याबद्दल पंतप्रधानांनी कौतुक केले. पर्यावरण रक्षणासाठी प्लास्टिकचा वापर टाळणे आणि आपल्या परिसरातील स्वच्छता राखणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

केजमध्ये मान्यवरांची मांदियाळी

पंतप्रधानांचा हा प्रबोधनात्मक विचार ऐकण्यासाठी केज येथील कार्यक्रमाला परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यामध्ये सुनील घोळवे, सूरज घुले, प्रकाश मुंडे, खदिर खुरेशी, अविनाश साबळे, संजय गुंड, संतोष जाधव, कमलाकर सोनवणे, रफिक इनामदार, अर्जुन बनसोडे, सुजित स्त्वधर, आदित्य नेहरकर, जुबेर शेख, शुभम लोंढे, अश्फाक शेख इत्यादींसह अनेक राष्ट्रप्रेमी नागरिक आणि कार्यकर्ते उपस्थित होते.कार्यक्रम संपल्यानंतर उपस्थितांनी पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद देत, त्यांनी मांडलेल्या जनहितार्थ संकल्पना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचा आणि केज शहरात विविध सामाजिक उपक्रम राबवण्याचा संकल्प केला. अत्यंत उत्साही वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला.

## सिमरी पारगाव येथे राजमाता अहिल्याबाई होळकर जयंती उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील सिमरी पारगाव येथे दि. ३१ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता राजमाता अहिल्याबाई होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी गावातील नागरिक, युवक, महिला तसेच विविध मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



कार्यक्रमास गावचे सरपंच, उपसरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष, पोलीस पाटील तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना प्रकाश कोरडे सर यांनी राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, अहिल्याबाई होळकर या जगातील उत्कृष्ट महिला प्रशासकांपैकी एक होत्या. त्यांच्या जीवनकार्याकडे पाहून संघर्ष, समाजसेवा, सामाजिक न्याय आणि लोककल्याणाची प्रेरणा मिळते. त्यांनी आपल्या कारकिर्दीत जनतेच्या हितासाठी अनेक लोकाभिमुख निर्णय घेतले. महिलांच्या सन्मानासाठी आणि शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे त्या आजही आदर्श राज्यकर्त्या म्हणून स्मरणात आहेत. उपस्थित मान्यवरांनीही राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या विचारांचा वारसा जपण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात उपस्थितांनी त्यांच्या कार्याला अभिवादन करत समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन गावातील ग्रामस्थांच्या सहकार्याने यशस्वीरित्या पार पडले.

## गुणवंत विद्यार्थी उद्याच्या भारताचे शिल्पकार- पत्रकार कमलेश जाब्रस

माजलगाव । प्रतिनिधी

आजचे गुणंवत विद्यार्थी उद्याच्या भारताचे शिल्पकार असुन माजलगावच्या कर्मयोग करिअर अकॅडमीने गुणवंत विद्यार्थ्यांचा केलेला सत्कार समाजाचा अभिमान असल्याचे पत्रकार कमलेश जाब्रस यांनी सांगीतले. शहरातील कर्मयोग करिअर अकॅडमीच्या गुणवंत विद्यार्थी सत्कार व कर्मयोगी पुरस्कार वितरण सोहळ्याचे उद्घाटक म्हणुन ते बोलत होते.




यावेळी व्यापारी अध्यक्ष महासंघाचे सुरेंद्र रेदासनी, नगरसेवक शरद यादव, राधेश्याम लोहिया, अकॅडमीचे संचालक कैलास काबरा उपस्थिती होते. प्रास्ताविकात कैलास काबरा यांनी कर्मयोग अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी दहावी सीबीएसई बोर्ड परीक्षेत १००% निकाल साध्य करून शैक्षणिक गुणवत्तेचा नवीन उच्चांक प्राप्त केला आहे असे सांगितले. यावेळी धनराज बजाज, भावेश परदेशी, तेजस्विनी सोळंके, भार्गवी गुंजकर, अनुज भुतडा, राघव पवार, रौनक वारकरी, प्रांजल नरवडे, श्रेया कलंत्री, यशश्री गायकवाड, स्वरूप राठोड, शुमैला पठाण, अर्णव भुतडा, हर्षदा ठाकूर, सार्थक सोनी, जय पगारिया, ओंकार कटके, प्राची देशमुख, आयुष सोनी, सिद्धी जाधव, दर्शन कुलकर्णी, यशश्री कटके, अक्षदा साळुंके, विठ्ठल गुळभिले, योगराज पवार, जिनेंद्र पगारिया, मुक्ता पोळ, सक्षम शेजुळ, आरुष गडम, अभिरा देशमुख, शिवम नाईकनवरे, सई कदम, सुहृदा कुलकर्णी, सत्यजीत पवार, निमिष काबरा, ईश्वरी आकुसकर, श्रेया चव्हाण, मयंक जाधव, परिधी रेदासनी, प्रथमेश सोळंके, सान्वी देशमुख, तक्षवी सोळंके, ख्याती तातेड, यशश्री गवते, आरव भुतडा, अक्षिका रेदासनी, शर्वरी देशमुख, वेदिका गवते, वेदिका आगे या गुणवंत विद्यार्थ्यांना ट्रॉफी, बॅच फोटो फ्रेम, मेडल व सर्टिफिकेट सत्कारस्वरुप देण्यात आले. सूत्रसंचालन सिद्धांत स्वामी यांनी केले तर आभार ऐश्वर्या देशमुख यांनी मानले. अकॅडमीच्या शिवप्रसाद कासट, गणेश माने, प्रियंका काबरा, शिवकन्या सोनवळे यांनी कार्यक्रमासाठी पुढाकार घेतला.

# घाटनांदूरच्या ग्रामविकास अधिकारी महेश फड यांना कार्यमुक्त करून कारवाई करण्याची मागणी

**घाटनांदूर । प्रतिनिधी**

येथील ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी महेश फड यांच्याविरोधात सकल धनगर समाजाच्या वतीने उपविभागीय कार्यालय अंबाजोगाई,पंचायत समिती अंबाजोगाईचे गटविकास अधिकारी यांच्याकडे तसेच तहसील कार्यालय अंबाजोगाई या तीन ठिकाणी निवेदन सादर करण्यात आले असून, त्यांना तात्काळ कार्यमुक्त करून शिस्तभंगाची व कायदेशीर कारवाई करण्याची मागणी घाटनांदुर येथील सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, दि. ३१ मे २०२६ रोजी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती देशभरात आणि महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शासनाच्या नियमांनुसार महापुरुषांच्या जयंती कार्यक्रमांना संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती अपेक्षित असताना घाटनांदूर ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी महेश फड हे अनुपस्थित राहिल्याचा आरोप करण्यात आला आहे



तसेच, ग्रामविकास अधिकारी महेश फड यांना अनुपस्थितीबाबत विचारणा करण्यात आली असता त्यांनी उध्दट व बेजबाबदार भाषेत उत्तर दिल्याचा तसेच समाजाच्या भावना दुखावतील असे वक्तव्य केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकारामुळे धनगर समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या असून संबंधित अधिकाऱ्यांचे वर्तन शासकीय सेवकाला शोभणारे नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सकल धनगर समाजाने आपल्या निवेदनात महेश फड यांना कर्तव्यकसुरी व समाजाचा अपमान केल्याबद्दल तात्काळ सेवेतून कार्यमुक्त करण्याची मागणी केली आहे. तसेच त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी करून शासकीय नियमांनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

याशिवाय शासकीय पदाचा गैरवापर करून सामाजिक तेढ निर्माण केल्याचा आरोप करत संबंधित अधिकाऱ्यांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अन्यथा कार्यालय समोर सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने आमरण उपोषण करण्याची मागणी निवेदनाद्वारे उपविभागीय कार्यालय,अंबाजोगाई पंचायत समिती कार्यालय अंबाजोगाई व तसेच तहसील कार्यालय अंबाजोगाई या ठिकाणी करण्यात आली आहे.

दरम्यान, या निवेदनामुळे घाटनांदूर परिसरात चर्चा रंगली असून प्रशासन याबाबत कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. संबंधित प्रकरणाची चौकशी झाल्यानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

पान ६ वरुन...

### मुंडे साहेबांना आवडेल

त्यांना आवडत नाही कोणतीही गोष्ट खरं तर मी करतच नाही पण एक तो संकल्प यावर्षी मी करणार आहे. जो साहेबांना आवडणार आहे, त्यांच्या व्यक्तिमत्वातून ती बाजूलाच करता येणार नाही, तो त्यांना अत्यंत प्रिय आहे, ते तुम्ही पाहाच असं त्यांनी म्हटलं आहे.

**पुण्यतिथीची तयारी:** गोपीनाथ गडावर यंदा भव्य दिव्य कार्यक्रम नसला तरी यादिवशी भजन, प्रसाद व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याची तयारी सध्या गडावर सुरू आहे.

### माजलगांव शहर पोलीसांकडून

माजलगाव शहर हद्दीमध्ये गोवंशीय जनावरांचे अवयव उघड्या जागेवर टाकल्याबाबत अनोळखी आरोपीतांविरुध्द गुरनं १७९/२०२६ दाखल आहे.सदर गुन्ह्याचे अनुषंगाने आरोपी नामे इमरान शकील कुरेशी वय ३८ वर्षे रा.गांधनपुरा, माजलगाव ता. माजलगाव जि. बीड व जफर गफार कुरेशी रा.खाटीक गल्ली,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड हे निष्पन्न झाल्याने त्यांना सदर गुन्ह्याचे तपास कामी अटक केले असुन अधिक तपास चालु आहे.

सदरची कारवाई चेतना तिडके मॅडम प्रभारी पोलीस अधीक्षक बीड, ऋषीकेश शिंदे सहाय्यक पोलीस अधीक्षक अंबाजोगाई अतिरीक्त पदभार उपविभाग माजलगाव यांच्या मार्गदर्शनाखालील पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, साह्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद मुंढे,पोलीस उपनिरीक्षक केरबा माकणे,पोहा कृष्णा जायभाये,पोकॉ.महादेव बहिरवाळ, पोकॉ महेश चव्हाण,पोकॉ सुनिल गवळी यांनी केली आहे.

### दुर्गराज रायगडावर

शिवशाहिरांचा... स्वराज्याच्या इतिहासाचा' आणि 'सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा' हे विशेष आकर्षण ठरणार आहे.५ जून रोजी दुपारी पाचाड येथील राजमाता जिजाऊ साहेबांच्या समाधीस अभिवादन करून सोहळ्याची सुरुवात होईल. त्यानंतर युवराज संभाजी छत्रपती महाराज आणि युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांच्या स्वागतानंतर शिवभक्तांसह रायगड चढाई केली जाईल. गडपूजन, पारंपरिक युद्धकलेची प्रात्यक्षिके, ढोल-ताशा, लेझीम, टाळ-मृदंगाचा गजर, शिवशाहिरांचा जागर, गडदेवता शिरकाई देवीचा गंधिक तसेच वारकरी संप्रदायाचे कीर्तन-भजन यांसारखे कार्यक्रम होणार आहेत. ''शिवराज्याभिषेक सोहळा हा केवळ उत्सव नसून स्वराज्याच्या गौरवशाली इतिहासाचा, शौर्याचा आणि राष्ट्रीय अस्मितेचा जागर आहे,'' असे मत गंगाधर काळकुटे यांनी व्यक्त केले,या पत्रकार परिषदेला शिवचरित्रकार ज्ञानदेव काशिद, ऋषिकेश बेदरे, सरदार लक्ष्मण नरनाळे आदी उपस्थित होते

### बाललैंगिक अत्याचार

राजकीय दबावाखाली दाखल करण्यात आली आहे,'' असा युक्तिवाद वकिलांनी केला. तसेच, पहिल्या पानावरील आरोपींच्या नावातील विसंगतता आणि मुख्य घटनेत काही आरोपींच्या भूमिकेचा अभाव या मुद्द्यांकडेही न्यायालयाचे लक्ष वेधण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर, न्यायालयाने आरोपींचे निर्दोषत्व, स्थानिक रहिवासी असणे आणि तपासात सहकार्य करण्याची तयारी लक्षात घेऊन आरोपींचा अंतरिम जामीन मंजूर केला. आरोपींच्या वतीने ॲड हरीश घायतिडक पाटील यांनी काम पाहिले. व ॲड व्हि. बी. लवटे यांनी मार्ग दर्शन केले ॲड डी. बी. कोरडे आणि शुभम नाटकर यांनी सहकार्य केले.

### कृषीपंपासाठी आठ

संबंधित प्रशासनाने याची दखल घेऊन शेतकऱ्यांना शेतीसाठी आठ तास वीज द्यावी अशी मागणी आहे.यावेळी युसुफवडगांव येथील सबस्टेशनचे अधिकारी विजय हलगुडे यांना एक निवेदन देऊन आठ तास वीज पुरवठा देण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे जर आठ तास वीज पुरवठा करण्यात आला नाही तरी रास्ता रोको करण्याचा इशारा देण्यात आला यावेळी मा.पं.स.सदस्य उमाकांत भुसारी, सरपंच मुकुंद कणसे,सतिश शिंदे,विजय इखे,गणेश इंगळे,रूपेश बोरगावकर,ओमकार लामतुरे,सुरज मुकदम,वैजनाथ थळकरी,प्रमोद जाधव,दिलीप लोंढे, राजभाऊ यादव,साहेबराव राऊत यांच्या सह परिसरातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गुलाब देत पोलीस

आहे. नागरिकांनी स्वतःहून नियमांचे पालन करून सुरक्षित वाहतुकीसाठी सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले.अपघात टाळण्यासाठी आणि स्वतःच्या तसेच इतरांच्या सुरक्षिततेसाठी वाहतूक नियमांचे पालन करणे किती आवश्यक आहे, याबाबत जिल्हा वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी अनेक वाहनचालकांनी पोलिसांच्या या सकारात्मक उपक्रमाचे स्वागत केले. दंडाच्या भीतीपेक्षा जनजागृती आणि समुपदेशनातून नागरिकांमध्ये अधिक चांगला संदेश पोहोचतो, असे कारवाई दरम्यान जिल्हा वाहतुक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी म्हटले आहे. या कारवाई दरम्यान सकाळच्या सत्रामध्ये जिल्हा कारागृहासमोर नगर नाक्यावरुन विरुध्द दिशेने येणाऱ्या २६ वाहन धारकांवर मोटार वाहन कायद्यान्वये केसेस करुन १७ हजार ५०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला व सायंकाळी नगर नाका येथे जिल्हा वाहतुक शाखा व शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या संयुक्त विद्यमाने बालाजी स्वीट होमसमोर नगर नाक्यावरुन विरुध्द दिशेने येणाऱ्या ३० वाहनांवर केसस करुन २२ हजार ५०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. या कारवाईसाठी पोलीस हवालदार सखाराम घोलप, ज्ञानेश्वर जाधव, सुनिल जाधव, कुडके, पोलिस अंमलदार मोरे, शिवाजी नगर पो.स्टे.चे ग्रेड पीएसआय मच्छिंद्र राख, पोलीस अंमलदार विजय बोडखे, श्रीराम मुंडे, जिल्हा वाहतुक शाखेचे चालक कदम व वाघमारे यांनी सहभाग नोंदवून कर्तव्य बजावले.वाहतूक नियमांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी बीड पोलिसांकडून वेळोवेळी अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, नागरिकांनी त्यास सकारात्मक प्रतिसाद द्यावा, असे आवाहन जिल्हा वाहतूक शाखा बीड यांनी केले आहे.

cmyk

# भारताचे २५ हजार मेट्रिक टन सोयाबीन पेंडीच्या निर्यातीचे करार रद्द

मुंबई : भारताच्या सोयाबीन पेंडीच्या निर्यात व्यवसायाला मोठा धक्का बसला आहे. देशांतर्गत बाजारात सोयाबीन पेंडीच्या किमतींमध्ये झालेल्या अचानक वाढीमुळे भारतीय पुरवठादारांना परदेशी खरेदीदार मिळेनासे झाले आहेत. परिणामी, भारतीय कंपन्यांना सुमारे २५ हजार मेट्रिक टन सोयाबीन पेंडीच्या निर्यातीचे करार रद्द करावे लागले आहेत.

माध्यमांच्या वृत्तानुसार, या परिस्थितीचा सर्वाधिक फायदा अमेरिका आणि दक्षिण अमेरिकेतील देशांना होत असून ते आता आशियाई बाजारपेठांमध्ये आपली पकड मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहेत. गेल्या महिन्यात भारतातील सोयाबीन पेंडीच्या किमतींमध्ये तब्बल ४१ टक्क्यांची वाढ झाली आहे.

सध्या सोयाबीन पेंड ६६ हजार रुपये प्रति मेट्रिक टन या चार वर्षांतील उच्चांकावर पोहोचली आहे. या दरवाढीमुळे भारतीय सोयाबीन पेंड आंतरराष्ट्रीय बाजारात महाग झाली असून परदेशी खरेदीदारांनी भारतीय बाजाराकडे पाठ फिरवण्यास सुरुवात केली आहे. जून महिन्यातील निर्यातीसाठी भारतीय सोयाबीन पेंडीचा दर सुमारे ६९५ डॉलर प्रति मेट्रिक टनपर्यंत पोहोचला आहे. विशेष म्हणजे, एका महिन्यापूर्वी हाच दर सुमारे ४७५ डॉलर प्रति टन होता. म्हणजेच केवळ एका महिन्यात प्रति टन २०० डॉलरहून अधिकची वाढ झाली आहे. या अचानक वाढलेल्या किमतींमुळे परदेशी खरेदीदारांनी नवीन ऑर्डर देण्यास नकार दिला. किमतींमधील तीव्र वाढीमुळे भारतीय निर्यातदार आणि परदेशी खरेदीदारांनी मे आणि जून महिन्यातील अनेक खेपांचे करार परस्पर संमतीने रद्द केले आहेत. २०२१ नंतर प्रथमच भारताला इतक्या मोठ्या प्रमाणावर सोयाबीन पेंडीचे निर्यात करार रद्द करावे लागले आहेत. त्यामुळे भारतीय निर्यातदारांची चिंता वाढली आहे. भारतीय बाजारातील दरवाढीमुळे आशियाई खरेदीदार आता अमेरिका आणि दक्षिण अमेरिकन देशांकडे वळत आहेत. पूर्वी भारतातून मोठ्या प्रमाणावर सोयाबीन पेंड खरेदी करणारे ग्राहक आता पर्यायी बाजारपेठांचा शोध घेत आहेत. जर भारतातील दर दीर्घकाळ उच्च पातळीवर राहिले, तर जागतिक बाजारपेठेतील भारताचा हिस्सा कमी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



## आता भारतालाच करावी लागणार आयात

विशेष म्हणजे, पूर्वी सोयाबीन पेंडीची निर्यात करणाऱ्या भारताला आता सोयाबीन आयात करण्याची वेळ आली आहे. भारतीय व्यापाऱ्यांनी आफ्रिकन देशांकडून अंदाजे ८० हजार टन सोयाबीन आयात करण्याचे करार केले आहेत. मनोज अग्रवाल यांनी दिलेल्या माहितीनुसार, जून आणि जुलै महिन्यात भारतात पाठवण्यासाठी प्रति टन ७०० ते ७६० डॉलर दराने सोयाबीन खरेदी करण्यात आले आहे. सप्टेंबर २०२६ पर्यंत भारताची एकूण सोयाबीन आयात तब्बल ८ लाख टनांपर्यंत पोहोचू शकते. गेल्या वर्षी भारताने केवळ सुमारे २ हजार टन सोयाबीन आयात केले होते. त्या तुलनेत यंदाचा संभाव्य आकडा विक्रमी मानला जात आहे.

## नॉन-जीएम सोयाबीनलाच परवानगी

भारतात केवळ नॉन-जेनेटिकली मॉडिफाइड (नॉन-जीएम) सोयाबीनच्या आयातीला परवानगी आहे. त्यामुळे आयातीचे पर्याय मर्यादित झाले आहेत. भारत मुख्यतः बेनिन, नायजर, टोगो आणि नायजेरिया यांसारख्या आफ्रिकन देशांकडून सोयाबीन आयात करतो. या देशांतील नॉन-जीएम सोयाबीन पारंपरिक जीएम पिकांच्या तुलनेत अधिक महाग असल्याने आयातीचा खर्चही वाढत आहे.

## कुक्कुटपालन आणि पशुखाद्य उद्योगावर परिणाम

सोयाबीनच्या वाढत्या किमतींचा परिणाम केवळ निर्यात व्यवसायापुरता मर्यादित राहणार नाही. कुक्कुटपालन, पशुखाद्य आणि खाद्यतेल उद्योगांवरही याचा थेट परिणाम होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांसाठी ही परिस्थिती संमिश्र मानली जात आहे. वाढलेल्या दरांमुळे शेतकऱ्यांना चांगला परतावा मिळू शकतो, मात्र निर्यातीतील घसरण आणि बाजारातील अनिश्चिततेमुळे भविष्यात अडचणी वाढू शकतात.

# पशुंच्या आहारात हिरव्या चाऱ्याचे महत्व



महाराष्ट्रात पशुपालन व दुग्ध व्यवसाय हा शेतीला पूरक जोडधंदा तसेच अधिक उत्पन्न व आर्थिक स्थैर्य देणारा व्यवसाय म्हणून ओळखला जातो. दुग्ध व्यवसायात मिळणारे उत्पादन हे पशुच्या अनुवांशिकतेवर आणि त्याला देण्यात येणार्या संतुलित आहारावर अवलंबून असते.शेतकऱ्यांमध्ये चारा पिकांच्या सुधारित वाणांच्या लागवडीबाबत असलेल्या अज्ञानामुळे बहुतेक ठिकाणी हिरव्या चाऱ्याची कमतरता ३५ ते ४० टक्के पर्यंत दिसून येते. ज्वारी, मका, बाजरी, चवळी, संकरित नेपिअर, मारवेल गवत, मद्रास अंजन, स्टायलो असा वेगवेगळ्या प्रकारचा हिरवा चारा महाराष्ट्रात आढळून येतो.

पशु आहारात दर्जेदार हिरव्या चाऱ्याचे महत्त्व :जनावरांची निरोगी वाढ व प्रजनन क्षमता टिकवण्यासाठी हिरवा चारा आवश्यक आहे. हिरवा चारा चवदार व पाचक असल्याने आहारातील महत्त्वाचे घटक नैसर्गिक स्वरुपात उपलब्ध झाल्याने जनावराचे शरीराच्या कोणत्याही अवयवावर ताण न येता पचन होते व तापमान नियंत्रित राहण्यास मदत होते. जनावरांच्या आहारात हिरव्या चाऱ्याची कमतरता असल्यास उत्तम खुराक देऊन सुध्दा जनावरांचे उत्पादनक्षम वय व उत्पादन यावर विपरीत परिणाम होवू शकतो. दर्जेदार हिरव्या चारा अभावी गाभण गायींना कमजोर व रोगट वासरे निपजतात. आहारात जास्त प्रमाणात खुराक व कमी प्रमाणात हिरवा चारा असे प्रमाणे जास्त काळ राहिल्यास जनावरांच्या पचन संस्थेवर विपरीत परिणाम होतो.जनावरांना असा द्यावा हिरवा चारा : वरील बाबींचा विचार करून पूर्ण वाढ झालेल्या जनावरास (४०० किलो वजन) गाईला सरासरी २० ते २५ किलो हिरवा चारा (निम्मा एकदल म्हणजेच मका, ज्वारी, बाजरी, संकरित नेपीअर अथवा गवते व निम्मा व्दिदल चारा म्हणजे लसुण घास, बरसीम, चवळी, स्टायलो तसेच ५ ते ६ किलो कोरडा चारा (कडबा, वाळलेले गवत, गव्हाचा भुसा, सरमाड इ.) रोज द्यावा. त्याचबरोबर १.५ ते २.० किलो खुराक, ३० ते ४० ग्रॅम खनिज मिश्रण व दिवसातून २ ते ३ वेळेस पाणी पाजावे, चारा शक्यतो कुट्टी करून द्यावा म्हणजेच चारा वाया जाण्याचे प्रमाण कमी होईल, तसेच चाऱ्याचे पचन चांगले होऊन चारा खाण्यासाठी लागणारी उर्जा कमी प्रमाणात लागेल.

# नांदेडमधील १० कृषी निविष्ठा केंद्रांचे परवाने निलंबित

नांदेड : नांदेड जिल्ह्यात खरिप हंगामापूर्वी डीएपी, युरिया व इतर रासायनिक खतांची कृत्रिम टंचाई निर्माण करून चढ्या दराने विक्री होत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून प्राप्त झाल्यानंतर कृषी विभागाने कारवाईचा बडगा उगारला आहे. या प्रकरणी नायगाव तालुक्यातील सात, कंधार तालुक्यातील दोन आणि मुदखेड तालुक्यातील एका अशा एकूण १० कृषी निविष्ठा केंद्रांचे खत विक्री परवाने सहा महिन्यांसाठी निलंबित करण्यात आले आहेत. तसेच दोन केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी दिली.


खरिप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांना पेरणीसाठी आवश्यक असलेल्या युरिया, डीएपी आणि इतर रासायनिक खतांची कृत्रिम टंचाई निर्माण करून जादा दराने विक्री होत असल्याच्या तक्रारी कृषी विभागाकडे प्राप्त झाल्या होत्या. त्यानंतर संबंधित कृषी सेवा केंद्रांची चौकशी व सुनावणी करण्यात आली. सुनावणीनंतर निदर्शनास आलेल्या त्रुटींच्या आधारे दशरथ कृषी सेवा केंद्र, केदार कृषी सेवा केंद्र, वसंत ॲग्रो सर्व्हिस सेंटर, गजानन कृषी सेवा केंद्र, हनुमान कृषी सेवा केंद्र, मातोश्री ॲग्रो एजन्सी, शिवकृपा कृषी सेवा केंद्र (सर्व ता. नायगाव), वर्षा ॲग्रो ट्रेडर्स, खांबाळा (ता. मुदखेड), तसेच व्यंकटरमणा कृषी सेवा केंद्र आणि तिरुमला कृषी सेवा केंद्र, कुरुळा (ता. कंधार) यांच्या परवान्यांवर सहा महिन्यांची निलंबन कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, शिवकृपा कृषी विकास केंद्र, माळकौठा (ता. मुदखेड) आणि व्यंकटेश कृषी भांडार, नवीन मोंढा (नांदेड) या दोन कृषी विक्री केंद्रांकडून खत वितरणात गंभीर स्वरूपाच्या अनियमितता झाल्याचे आढळून आले. या प्रकरणी संबंधितांविरुद्ध पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल झाल्याने त्यांच्या परवान्यांचे कायमस्वरूपी रद्दीकरण करण्यात आले आहे. जिल्ह्यात कुठेही रासायनिक खतांची जादा दराने अथवा विनापरवाना विक्री होत असल्यास, तसेच उपलब्ध खतांचा पुरवठा जाणीवपूर्वक रोखून ठेवला जात असल्यास शेतकऱ्यांनी तत्काळ कृषी विभागाशी संपर्क साधावा. तसेच शेतकऱ्यांनी केवळ परवानाधारक कृषी निविष्ठा केंद्रांतूनच निविष्ठांची खरेदी करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.



# उसाच्या पाचटापासून गांडूळ खत

शेती आणि खते यांचा परस्पर संबंध खूप घनिष्ठ आहेत. खतांशिवाय शेती शक्यच नाही. शेतकरी पिकांपासूनभरघोस उत्पादन मिळावे यासाठी रासायनिक खतांचा वापर करतात. परंतु रासायनिक खतांचा भरमसाट वापर यामुळेपर्यावरणाचे संतुलन बिघडलेच परंतु जमिनीचा पोत ढासळण्याची देखील मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली आहे. तसेच मानवी आरोग्यावर देखील रासायनिक खतांचा भरमसाट वापर याचा दुष्परिणाम पाहायला मिळतो. या सगळ्या गोष्टींवर उपाय म्हणजे सेंद्रिय खतांचा जास्तीत जास्त वापर करणे हाहोय.शेतकरी तसे शेणखत, कंपोस्ट खताचा मोठ्या प्रमाणात वापर आता करू लागले आहेत. परंतु शेतामधील पिकांचे उरलेल्या अवशेषांचा वापर करून देखील चांगल्या पद्धतीने खत निर्मिती करता येते.

जागेची निवड व शेड बांधणी : गांडूळ खत निर्मिती करण्यासाठी खड्ड्यावर दिवसभर सावली राहावी यासाठी छप्पर करावे. त्यासाठीशेतात मिळणाऱ्या वस्तू जसे की लाकूड,उसाचे पाचट, बांबूइत्यादी साहित्यांचा वापर करावा. हे शेड उभारताना त्याची मधील उंची साडेसहा फूट, बाजूची उंची पाच फूट व रुंदी दहा फूट असावी. छपरा ची लांबीती आपल्याकडे किती पांचट उपलब्ध आहे यानुसार कमी जास्त होऊ शकते. छपराच्या मध्यापासून १-१ फूट दोन्ही बाजूस जागा सोडून



चार फूट रुंदीचे व एक फूट उंचीच्या दोन समांतर वाफे वीट बांधकाम करून तयार करावेत व आतील बाजूने चांगल्या पद्धतीने प्लास्टर करून घ्यावे व खालील बाजूस कोबा करून घ्यावा. एक शेड तयार करताना जास्तीचे पाणी बाहेर काढण्यासाठी तळाशी पाईप टाकावा. वाफे तयार करण्याची दुसरी पद्धत म्हणजे वाफे जमिनीच्या वर बांधण्याऐवजी आठ ते नऊ इंच खोलीचे दोन समांतर चर काढावेत. खड्ड्यातील माती चांगली चोपून टणक करावी.पाचट कुजवणे : खत तयार करण्यासाठी केलेल्या छपरा मध्ये खोदलेल्या चरामध्येतेव्हा वीट बांधकाम केलेल्या टाकीमध्ये उसाचे पाचट भरावे. त्याची उंची जमिनीपासून/ विट बांधकामापासून २० ते ३० सेंटिमीटर ठेवावी. पाचट भरतांना एक टन पाचटसाठी आठ किलो युरिया,दहा किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि ताजे शेण खत १०० किलो वापरावे.नंतर या सगळ्या पदार्थांचे पाण्यात मिश्रण करून घ्यावे. पाचटाला पाच ते दहा सेंटिमीटर थर दिल्यानंतर त्यावर शेणखत, युरिया आणि सिंगल सुपर फॉस्फेट या द्रावणात पातळ थर द्यावा. याचबरोबर पाचट कुजण्याची प्रक्रिया लवकर होण्यासाठी पाचट कुजविणारे संवर्धक एक टनास एक किलो या प्रमाणात प्रत्येक थरावर थोडेसे वापरावे. नंतर हा खड्डा पूर्ण भरल्यानंतर त्यावर पुरेसे पाणी मारावे वपाण्याने भिजवून घेतलेल्या पोत्याने झाडून टाकावे.यावर दररोज पाणी मारत रहावे. असे एक महिना पाणी मारल्यानंतर पाचट अर्धवट कुजलेले दिसेल शिवाय उष्णता कमी झाल्याचे आढळून येते. असे अर्धवट कुजलेल्या १ टन पाचटासाठी दोन हजार हसीनिया फोटेडा जातीची गांडुळे सोडावी व हे गांडुळे सोडल्यानंतर सर्वसाधारणपणे अडीच ते तीन महिन्यांनी उसाच्या पाचटापासून उत्तम प्रतीचे गांडूळ खत तयार होते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८०० : कॅनडात जगातील सर्वप्रथम कांजिण्याची लस देण्यात आली.
१८६२ : अलेक्झांडर ग्राहम बेल यांनी टेलीफ़ोनचा शोध लावला.
१८९६ : गुग्लिएल्मो मार्कोनी यांनी 'रेडिओ'चे पेटंट घेतले.
१८९७ : आपल्या मृत्यूचे वृत्त वर्तमानपत्रात वाचून मार्क ट्वेनने न्यूयॉर्क टाईम्सला सांगितले ''माझ्या मृत्यूचे वृत्त ही अतिशयोक्ती आहे''.
१९४६ : राजा उंबेर्तो-२ ला हटवून इटलीने राजेशाही संपवली स्वतःला प्रजासत्ताक घोषित केले.
१९४७ : भारताची फ़ाळणी करण्याची लॉर्ड मांऊटबॅटन यांची घोषणा.
१९४८ : शेतकरी कामगार पक्षाची स्थापना.
१९४९ : दक्षिण अफ्रिकेने गोरे सोडुन इतरांना दुय्यम नागरिक ठरवण्याचा कायदा केला.
१९५३ : इंग्लंडची राणी दुसरी एलिझाबेथ हिचा राज्यारोहण समारंभ झाला. इंग्लंडच्या राष्ट्रप्रमुखाचा राज्यारोहण समारंभ प्रथमच दूरचित्रवाणीद्वारे जगभर पाहिला गेला.
१९६६ : अमेरिकेचे पहिले अंतरीक्ष यान चंद्राच्या पृष्ठभागावर यशस्वीरित्या उतरले.
१९७४ : माली या देशाने आपले संविधान स्वीकारले. (१९७४)
१९७९ : पोप जॉन पॉल (दुसरे) यांनी (आपल्या मायदेशाला) पोलंडला भेट दिली. कम्युनिस्ट राष्ट्राला भेट देणारे ते पहिलेच पोप होत.
१९९९ : भूतानमधे दूरचित्रवाणी प्रसारण सुरू झाले.
२००० : लेखिका व कवयित्री अमृता प्रीतम यांना दिल्ली सरकारचा अकरा लाख रुपयाचा सहस्रकातील कवयित्री हा पुरस्कार जाहीर
२००४ : ऑस्ट्रेलियन मॉडेल्स जेनीफर हॉकिन्स यांनी विश्वसुंदरी चा किताब पटकाविला.
२००६ : अमेरिकेने आंतरराष्ट्रीय गुन्हेगार दाऊद इब्राहिम आणि त्याच्या संपूर्ण संघटनांवर प्रतिबंध लावला.
२०१४ : तेलंगण भारताचे वे२९ राज्य झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७३१ : मार्था वॉशिंग्टन अमेरिकेची पहिली 'फर्स्ट लेडी' (मृत्यू: २२ मे १८०२)
१८४० : थॉमस हार्डी इंग्लिश लेखक आणि कवी (मृत्यू: ११ जानेवारी १९२८)
१९०७ : मराठी नाटककार आणि लेखक विष्णू विनायक बोकील यांचा जन्म.
१९३० : अमेरिकन अंतराळवीर पीट कॉनराड यांचा जन्म.
१९३० : भारतीय जनता पक्षाचे राजकीय नेता व मध्यप्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री बाबूलाल गौर यांचा जन्मदिन.
१९५१ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी व पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या मंत्रिमंडळातील माजी केंद्रीय अवजड उद्योग आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे केंद्रीय कॅबिनेट मंत्री तसचं माजी केंद्रीय ऊर्जा व शिवसेना पक्ष सदस्य अनंत गंगाराम गीते यांचा जन्मदिन.
१९४३ : इलियाराजा गीतकार आणि संगीतकार
१९५५ : नंदन नीलेकणी 'इन्फोसिस'चे सहसंस्थापक
१९५५ : चित्रपट दिग्दर्शक मणिरत्नम यांचा जन्म.
१९५६ : मणीरत्नम चित्रपट दिग्दर्शक
१९६३ : आनंद अभ्यंकर अभिनेते (मृत्यू: २३ डिसेंबर २०१२)
१९६५ : मार्क वॉ ऑस्ट्रेलियन क्रिकेटखेळाडू
१९६५ : स्टीव्ह वॉ ऑस्ट्रेलियन क्रिकेटखेळाडू
१९७४ : गाटा काम्स्की अमेरिकन बुद्धीबळपटू
१९८० : अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय तिरंदाजपटू डोला बॅनर्जी यांचा जन्मदिन.
१९८७ : भारतीय चित्रपट अभिनेत्री व गायिका सोनाक्षी सिन्हा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८२ : जुसेप्पे गॅरीबाल्डी इटालियन सेनापती व राजकीय नेता (जन्म: ४ जुलै १८०७)
१९७५ : देवेन्द्र मोहन बोस वैश्विक किरणांवर मूलभूत संशोधनाची सुरूवात करणारे भारतीय पदार्थवैज्ञानिक (जन्म: २६ नोव्हेंबर १८८५)
१९७८ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय वैज्ञानिक प्राण कृष्ण पारिजा यांचे निधन.
१९८८ : राज कपूर अभिनेता, निर्माता व दिग्दर्शक आणि 'द ग्रेटेस्ट शो मॅन' (जन्म: १४ डिसेंबर १९२४)
१९९० : सर रेक्स हॅरिसन ब्रिटिश आणी अमेरिकन रंगभूमीवरील आणि हॉलिवूड चित्रपटांतील अभिनेते (जन्म: ५ मार्च १९०८)
१९९२ : मराठी संस्कृतीचे जर्मन अभ्यासक डॉ. गुंथर सोन्थायमर यांचे निधन. (जन्म: २१ एप्रिल १९३४)
२०१४ : भारतीय कार्डिनल दुर्यसामी सायमन लौरडुसामी यांचे निधन. (जन्म: ५ फेब्रुवारी १९२४)

# शेळ्यांचे जंत निर्मुलन व आरोग्य व्यवस्थापन

शेळीला गरीबाची गाय असे संबोधले जाते. शेळी ही रोगाला फारशी बळी पडत नाही, परंतु विशेषतः पावसाळ्यात शेळीची विशेष काळजी घ्यावी लागते. त्याकरिता वेळेवर लसीकरण करणे, नियमित जंत निर्मुलन, गोठ्याची स्वच्छता, गव्हाणीचा वापर या बाबींचा आरोग्यावर निश्चित परिणाम होतो. शेळ्यांच्या जंतनिर्मुलनासाठी जंतनाशक वापर : शेळ्यांची सदृढ पचनसंस्था व आरोग्यासाठी जंत निर्मुलन करून घेऊन खालीलप्रमाणे जंतनाशक औषधांचा वापर करावा. करडांच्या वयाच्या २० ते ३० दिवसापासून जंतनाशक औषधे देता येतात. जानेवारी व जुलै : अल्बेन्डाझॉल १० मि.ग्रॅ. प्रति किलो वजनाप्रमाणे चपटेकृमी व गोलकृमी जंतांच्या निर्मुलनासाठी वापरावे.

एप्रिल व ऑक्टोबर : डोस्टोडीन किंवा झोनील पैकी कोणतेही एक औषध यकृत कृमीच्या निर्मुलनासाठी १० मि.ग्रॅ. प्रतिकिलो वजनाप्रमाणे वापरावे. लाळ्याखुरकत : हा विषाणूजन्य रोग आहे. या रोगाच्या प्रमुख लक्षणामध्ये शेळ्यांच्या जिभेवर तोंडात, पायात, कासेवर आणि तोंडाच्या आतील भागावार फोड येतात. तोंडातून जास्त प्रमाणात लाळ पडते. उपचार व प्रतिबंध : या रोगामुळे शेळ्यांचे खाणे-पिणे कमी होते. त्यामुळे शेळ्या कमजोर होतात. त्याकरिता त्यांना पाण्यातून जीवनसत्त्वे द्यावेत. जिभेचे फोड अन्टीसेप्टीक औषध लावून धुवावे. प्रतिबंधात्मक उपचाराकरिता वर्षातून दोन वेळा लस टोचून घ्यावे.




राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
मंगळवार दि.२ जून २०२६






# रस्ता खुला करुन देण्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांचे मुलाबाळासह उपोषण

मंठा। प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील विडोळी ते देवठाणा (मंठा) येथील शिव पांदण रस्स्त्याच्या कामात सतत अडथळा निर्माण करुन शेतात जाणाऱ्या रस्त्याचे काम अडविणाऱ्या गैरअर्जदार शेतकऱ्यांविरुद्ध कारवाई करून रस्ता खुला करून द्यावा या मागणीसाठी विडोळी येथील शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयासमोर सोमवार ता. १ पासून आमरण उपोषण सुरु केले आहे. विडोळी खुर्द येथील शेतकऱ्यांच्या पुर्वीपासून वडिलोपार्जीत शेतजमीनी असून शिवारामध्ये जवळपास १०० ते १५० शेतकरी आहेत. त्यांना शेतात जाण्याकरिता विडोळी ते देवठाणा (मंठा) येथील शिवपांदण रस्त्याचे तत्कालीन तहसिलदार मंठा यांनी उद्घाटन करून मागील तीन-चार वर्षांपूर्वी काम सुरू केले होते.

हे काम जवळपास दोन कि.मी. पूर्ण केले, त्यानंतर शेतापर्यंत जाण्यकरिता केवळ २०० ते ३०० मीटर रस्त्याचे काम अपूर्ण




राहिले आहे आणि ते अपूर्ण रहिलेले काम गैर अर्जदार गट नं. ८, ९ विडोळी बु. मधील ४२९, ४२८, ४२७, ४२६, ४२५, ४२४, ४२३, ४२२, ४२१, ४२०, ४१९, ४१७, ४९८, ७० मधील शेतकऱ्यांनी अडविले आहे. अपूर्ण राहिलेल्या या कामासाठी अनेक वेळा पाठपुरावा करूनही प्रशासनाने रस्ता खुला करून देण्याचे आदेश काढलेले असताना सुद्धा हा रस्ता खुला न झाल्यामुळे शेतकऱ्यांना दहा किलोमीटर पायपीट करून शेतात जावे लागते. सध्या पावसाळ्याचे दिवस असून या दोनशे ते तीनशे मीटर रस्त्यावर गुडघाभर पाणी साचून त्यामध्ये साप विंचू शेतकऱ्यांना इजा करण्याची शक्यता आहे.शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी रस्ते खुले करून द्यावेत याबाबत शासन निर्णय असताना सुद्धा शासनाच्या आदेशाला गैर अर्जदार शेतकरी हे केराची टोपली दाखवीत आहे. सदीरल प्रकरणी स्वतः जायमोक्याची पाहणी करुन गैरअर्जदार शेतकऱ्यांनी अडविलेला रस्ता खुला करुन देण्यात यावा या मागणीसाठी पुरुष व महिला शेतकरी आपल्या मुलां बाळासह एक जून पासून तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसले आहेत. उपोषणार्थींमध्ये आदिनाथ अशोकराव गोरे, विष्णु सोपानराव गोरे, एकनाथ ज्ञानोबा अवचार, अशोक बाबुराव गोरे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांचा सहभाग आहे.

# बसस्थानकात परिवहन महामंडळाचा ७८ वा वर्धापन दिन साजरा



जालना। प्रतिनिधी

राज्य परिवहन जालना आगार व बस स्थानक परिसरामध्ये दिनांक ०१/०६/२०२६ रोजी राज्य परिवहन महामंडळाचा ७८ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमास विभाग नियंत्रक श्रीमती मनीषा सपकाळ मॅडम, यंत्र अभियंता श्री स्वप्निल मासकर , श्री सुरेश टकले विभागीय वाहतूक अधिकारी, अजिंक्य जैवळ आगार व्यवस्थापक, श्री वैभव पडोळे सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक, श्री खान वाहतूक निरीक्षक, श्री मुजाहिद शेख वाहतूक निरीक्षक हे उपस्थित होते .कार्यक्रमाचे उद्घाटन विभाग नियंत्रक यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. सदर कार्यक्रमांमध्ये राज्य परिवहन महामंडळ मार्फत प्रवाशांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले तसेच पेढे वाटप करण्यात आले . आगारातील इंधन बचत करणारे चालक व उत्कृष्ट उत्पन्न आणणारे वाहक यांचा देखील या कार्यक्रमामध्ये सत्कार करण्यात आला.

# गुटखा असलेले दोन वाहन पकडले; २५ लाखाचा माल जप्त

जालना। प्रतिनिधी

मानवी आरोग्यास घातक प्रतिबंधीत गुटख्याचा साठा असलेले दोन वाहने जप्त करुन रु.२५,८४,०४२/- किंमतीचा मुददेमाल हस्तगत केला सदरील कारवाई स्थानिक गुन्हे शाखेची पोलिसांनी कारवाई केली .

जालना जिल्ह्यात मानवी आरोग्यास घातक प्रतिबंधीत गुटखा वाहतुक व विक्री करणारे संबंधी माहिती घेऊन कारवाई करणे बाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू , अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव व पथकास सुचना दिल्या होत्या.

त्यानुषंगाने गुटखा वाहतुक व विक्री करणाऱ्या इसमांबाबत माहिती घेत असतांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, कल्पतरु पार्क, जालना येथे एका बिल्डींगसमोर दोन वाहने उभी आहेत ज्यामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटख्याचा साठा आहे. त्यानुषंगाने सदरच्या माहितीच्या ठिकाणी जावुन पाहणी केली असता एक महिंद्रा बोलेरो पिकअप -२१--८१९९ व एक ॲपे लोडींग रिक्षामध्ये



रु. १४,८४,०४२/- किंमतीचा राजनिवास, रजनीगंधा, सिगनेचर पान मसाला, जाफरानी जर्दा मिळुन आला. त्यामुळे रु.१४,८४,०४२/- किंमतीचा पानमसाला/गुटखा व रु.११,००,०००/- किंमतीचे वाहने असा एकुण रु. २५,८४,०४२/-किमतीचा मुददेमाल जप्त करुन सदर वाहने बेवारस मिळुन आल्याने दोन्ही वाहनाचे चालक मालक यांच्याविरुध्द कदीम जालना पोलीस ठाणे, जालना येथे पोउपनि, राजेंद्र वाघ यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कदीम पोलीस ठाणे, जालना गु.र.क्र.२८४/२०२६ कलम १२३.२७३.२२३.३(५) भा.द.वि. मिळाला माल:-रु.१४,८४,०४२/- किंमतीचा पानमसाला/गुटखा व रु.११,००,०००/- किंमतीचे वाहने एकुण रु.२५,८४,०४२/- किंमतीचा मुददेमाल. आरोपी - महिंद्रा बोलेरो पिकअप -२१--८१९९ चा चालक/मालक एक ॲपे लोडींग रिक्षा चा चालक मालक, सदरची कार्यवाही स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि, सचिन खामगळ, पोउपनि राजेंद्र वाघ यांच्यासह पोलीस अंमलदार रमेश राठोड, प्रभाकर वाघ, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, सुधीर वाघमारे, इरशाद पटेल, शिवप्रसाद एखंडे, कैलास चेके.

# पाथर्डी तालुक्यात पाण्याची भीषण टंचाई!

## वाडी वस्ती तांडा आदिवासी पाड्यावर टँकरच्या खेपा वाढवण्याची मागणी !

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यात पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली असून ऐन उन्हाळ्यात नद्या विहीर बोरवेल तलाव कोरडे पडले आहेत यामुळे माणसांसहित मुकी जनावरं सुद्धा पाण्यावाचून तहानेने व्याकुळ झाले आहेत अशातच पाथर्डी तालुक्यात टंचाई काळात १९ गावांना दरडोई आठ लाख ५० हजार प्रति लिटर पाणी टँकरने सुरू आहे परंतु पाथर्डी तालुक्यातील प्रत्येक गावात पाण्याचा टँकर पोहोचतोच असे नाही रात्री अपरात्री पाण्याचा टँकर ब्लॅकने विकला जातो पाथर्डी तालुक्यात आज खाजगी टँकर वाल्याकडून पाणी पंधराशे ते दोन हजार रुपये प्रति टँकर देऊन पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे अशातच महाराष्ट्र शासनाच्या टंचाई काळात पाथर्डी महसूल आणि पंचायत समिती टंचाई विभागाकडून पाथर्डी तालुक्यातील प्रत्येक वाडी वस्ती तांडे आणि आदिवासी पाड्यावर अतिरिक्त पाण्याच्या टँकरच्या खेपा वाढवण्याची मागणी करण्यात आली आहे दुष्काळसदृश परिस्थितीत टंचाई काळात पाथर्डी तालुक्यात पाण्याचे स्रोत आटल्याने भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याने तातडीने अतिरिक्त पाणीपुरवठा करण्याची गरज आहे

पाथर्डी तालुक्यात १०७ ग्रामपंचायती आहेत त्यामुळे पाथर्डी तालुक्यात पाण्याची भीषण परिस्थिती निर्माण झाली असून केवळ सात ते आठ गावात पाण्याचे टँकर चालू आहेत त्यामुळे टँकरची संख्या वाढवून प्रत्येक गावाला प्रति तीन टँकर मंजूर करून पाणी देण्यात यावे अशी मागणी प्रांताधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करणार आहोत

– अजिनाथ कीर्तने ( मालेवाडी )

मे महिन्यात पाथर्डी तालुक्यात टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण झाली असल्याने पाथर्डी तालुक्यातील ग्रामीण भागात वाडी वस्ती तांड्यावर व आदिवासी पाड्यावर तेथील नागरिकांना मुबलक पाणीपुरवठा मिळावा यासाठी पाण्याचे टँकर सुरू असून अतिरिक्त पाण्याचे टँकर व खेपा निश्चितच दिल्या जातील संबंधित ग्रामपंचायत मार्फत प्रस्ताव पाठवावा तो तातडीने मंजूर केला जाईल

– प्रसाद मते ( प्रांताधिकारी पाथर्डी )

# प्रतिष्ठित व्यापारी अमोल काला यांचे निधन

मंठा : येथील प्रतिष्ठित व्यापारी तथा अमोल एजन्सीचे संचालक अमोल दिलीपकुमार काला यांचे रविवार ता. ३१ मे रोजी पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ४९ वर्षे होते. त्यांचा स्वभाव अत्यंत मनमिळाऊ असल्यामुळे त्यांचा मित्रपरिवार मोठा होता. सामाजिक क्षेत्रातही त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्यावर येथील हिंदू स्मशानभूमी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई-वडील, एक भाऊ, पत्नी, एक मुलगा, दोन मुली असा परिवार आहे.



# जिल्ह्यातील सहाय्यक पोलीस निरिक्षक, फौजदाराच्या २२ बदल्या

जालना। प्रतिनिधी

जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. तेगबिरसिंह संधू यांनी जिल्ह्यातील ११ सहाय्यक पोलीस निरीक्षकासह ११ फौजदारांच्या बदल्या केल्याचा आदेश आज निर्गमित केला - आहे. यामध्ये अंबड पोलीस ठाण्यातील अमोल गुर्ले यांची बदली गोंदी पोलीस ठाण्यात, घनसावंगी येथील अशोक नारायण खरात यांची चंदनझिरा पोलीस ठाण्यात, कदीम जालना पोलीस ठाण्याचे अमित व्यंकटेश म्हस्के यांची अंबड पोलीस ठाण्यात. सेवली पोलीस ठाण्यातील योगेश एकनाथ खटकळ यांची बदनापूर पोलीस ठाण्यात, चंदनझिरा पोलीस ठाण्यातील सुशिलकुमार प्रल्हाद चव्हाण यांची तालुका जालना पोलीस ठाण्यात तर गोंदी येथील आशीष श्रीनिवास खांडेकर, बदनापूर पोलीस ठाण्याचे अविनाश अशोक राठोड यांची टेंभूर्णी, बदनापूरच्या स्नेहा सुरेश करेवाड यांची नियंत्रण कक्षात, सदर बाजार येथील निता खंडूजी गायकवाड यांची सेवली पोलीस ठाण्यात, स्थानिक गुन्हे शाखेतील योगेश देविदास उबाळे यांची हसनाबाद आणि टेंभूर्णी येथील कैलास भारती यांची भोकरदनला बदली करण्यात अला आहे. याच बरोबर ११ फौजदारांच्या जिल्हा अंतर्गत बदल्या करण्यात आल्या असून यात घनसावंगीचे रामदास पांडूरंग काळे यांची बीडीडीएस विशेष शाखेत, घनसावंगीचे किरण गंगाधर पवार यांची जाफ्राबाद, जाफ्राबादचे वासुदेव पवार यांना त्याच जागेवर एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली असून तालुका जालना येथील संतोष सुर्यभान नागरगोजे यांची सदर बाजार, तालुका जालना येथील दिगंबर भास्कर पवार यांची चंदनझिरा, आष्टी येथील अजीत मधुकर चाटे यांची घनसावंगी, भोकरदन येथील पवन फुलसिंग राजपुत यांची सदर बाजार, अंबड येथील रंजना बागलाने यांची अंबड पिंक पथक, सायबर पोलीस ठाण्यातील योगेश हरि चव्हाण यांना त्याच जागी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली असून अंबड येथील किशोर अर्जुन वनवे यांची सदर बाजार आणि पिंक मोबाईल पथकाचे आदिनाथ काशीनाथ ढाकणे यांची अंबड पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे.

# अल्पवयीन विद्यार्थिनीचा छळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

मंठा। प्रतिनिधी

प्रेमसंबंधासाठी दबाव टाकत अल्पवयीन विद्यार्थिनीचा सतत छळ केल्याप्रकरणी मंठा तालुक्यातील पांगरी खुर्द येथील वैभव काळे या युवकाविरुद्ध मंठा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित विद्यार्थिनी ही शिक्षण घेत असून तिची सोयरिक एका युवकासोबत ठरली होती. मात्र गावातील वैभव काळे नामक युवकाने संबंधित मुलाला फोन करून ''मी तिच्यावर प्रेम करतो, तू तिच्याशी लग्न करू नकोस'' असे सांगून लग्न मोडल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

युवकाने पीडित विद्यार्थिनीला वारंवार फोन करण्यासाठी दबाव टाकणे, जीवे मारण्याच्या धमक्या देणे, घरासमोर शिट्ट्या वाजवत फिरणे तसेच शारीरिक व मानसिक त्रास देऊन लग्नासाठी दबाव टाकत होता. तसेच विद्यालयात ये-जा करत असताना आरोपीकडून सातत्याने त्रास दिला जात असल्याने विद्यार्थिनी मानसिक तणावात राहत होती. या जाचाला कंटाळून तिने मंठा पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली असून संबंधित युवकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल केंद्रे हे करीत आहेत.

# परिवहन खात्याच्या मराठी सक्तीच्या निर्णयाचे साहित्य संमेलनातून स्वागत; सात महत्त्वपूर्ण ठराव मंजूर

धाराशिव। प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेतर्फे आयोजित ३२ व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनात मराठी भाषा, साहित्य आणि साहित्यिकांच्या हितासाठी सात महत्त्वपूर्ण ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. यामध्ये परिवहन विभागाने टॅक्सी आणि रिक्षा चालकांसाठी मराठी भाषेची सक्ती करण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह असल्याचे नमूद करत राज्य शासनाचे अभिनंदन करणारा ठराव विशेष चर्चेचा विषय ठरला.

धाराशिव येथील 'लोकनेते अजितदादा पवार साहित्य नगरी' मध्ये आयोजित या संमेलनात ज्येष्ठ साहित्यिक डॉ. नंदकुमार राऊत अध्यक्षस्थानी होते. स्वागताध्यक्ष आमदार कैलास घाडगे-पाटील, अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांच्यासह साहित्य, कला आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. संमेलनादरम्यान मराठी भाषा संवर्धन, साहित्यिकांचे प्रश्न आणि त्यांच्या सामाजिक सुरक्षेशी संबंधित विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यानंतर साहित्य परिषदेचे राष्ट्रीय विश्वस्त ज्ञानेश्वर



पतंगे यांनी सात महत्त्वपूर्ण ठराव सभागृहासमोर मांडले. या सर्व ठरावांना उपस्थित साहित्यिक, प्रतिनिधी आणि रसिकांनी उत्स्फूर्त पाठिंबा दिला. परिवहन विभागाने टॅक्सी व रिक्षा चालकांसाठी मराठी भाषेचे ज्ञान अनिवार्य करण्याचा घेतलेला निर्णय हा मराठी भाषेच्या जतन आणि संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असल्याचे संमेलनात नमूद करण्यात आले. सर्वसामान्य नागरिकांशी संवाद अधिक सुलभ व्हावा आणि मराठी भाषेला दैनंदिन व्यवहारात अधिक प्राधान्य मिळावे, यासाठी हा निर्णय उपयुक्त ठरेल, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. याशिवाय साहित्यिकांना आर्थिक आणि सामाजिक सुरक्षेची हमी देण्यासाठी अनेक मागण्या ठरावांच्या माध्यमातून मांडण्यात आल्या. साहित्यिकांना प्रतिमहिना ३० हजार रुपये पेन्शन देण्यात यावी, साहित्यिक आणि त्यांच्या कुटुंबीयांना मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, तसेच साहित्यिकांसाठी मोफत शासकीय घरे उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. सर्व शासकीय कार्यालयांचे अध्यादेश आणि महत्त्वाची कागदपत्रे मराठीतच प्रसिद्ध करण्यात यावीत, अशी मागणीही संमेलनातून करण्यात आली. तसेच क्रीडापटूंप्रमाणे साहित्यिकांनाही वर्ग-१ शासकीय नोकऱ्यांमध्ये विशेष संधी देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

संमेलनात ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक स्वर्गीय भास्कर चंदनशिव यांच्या साहित्यिक योगदानाचा गौरव करत त्यांच्या नावाने महाराष्ट्र ग्रामीण साहित्य संशोधन केंद्र उभारण्याची मागणीही करण्यात आली. मराठी भाषा, साहित्य आणि साहित्यिकांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी आणि या सर्व ठरावांवर गांभीर्याने विचार करावा, अशी अपेक्षा संमेलनातील मान्यवरांनी व्यक्त केली.

# मुंबई-आग्रा महामार्गावर कारचा भीषण अपघात

## महालगाव-गंगापूरच्या क्रिकेटपटूंचा मृत्यू, दोघे गंभीर जखमी

गंगापूर। प्रतिनिधी

लेह-लडाखच्या रम्य सफरीची स्वप्ने डोळ्यांत साठवत गंगापूर आणि महालगाव परिसरातील चार जिवलग मित्र रविवारी (दि.३१) रात्री आनंदाने घरातून निघाले होते. मात्र नियतीने त्यांच्या आयुष्याला वेगळेच वळण दिले. मध्यप्रदेशातील सेंधवा येथील मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर सोमवारी (दि.१) पहाटे झालेल्या भीषण कार-कंटेनर अपघातात दोन उमदे युवा क्रिकेटपटू काळाच्या पडद्याआड गेले, तर अन्य दोघेजण गंभीर जखमी झाले.

या अपघातात महालगाव (ता. वैजापूर) येथील बद्रीनाथ ऊर्फ बद्री प्रमोद नांगरे (वय २६) यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर गंगापूर येथील अनिकेत अनिल काळे (वय २९) यांची मृत्यूशी सुरू असलेली झुंज उपचारादरम्यान अपयशी ठरली. जखमी ओंकार साबणे आणि त्यांचा मित्र भूषण यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अनिकेत, बद्री, ओंकार आणि भूषण हे चौघेजण कारने लेह-लडाखच्या सफरीसाठी निघाले होते. सोमवारी सकाळी साडेसहा ते



सातच्या सुमारास सेंधवा शहराजवळील जामली टोल प्लाझानजिक कारवरील नियंत्रण सुटल्याने वाहन दुभाजक ओलांडून विरुद्ध दिशेच्या मार्गावर गेले. त्याचवेळी समोरून येणाऱ्या भरधाव कंटेनरने कारला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी भीषण होती की कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलीस, डायल-११२ पथक आणि मदतकार्य यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली. जखमींना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र बद्री नांगरे यांचा जागीच मृत्यू झाला होता. गंभीर जखमी अनिकेत काळे यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांचीही प्राणज्योत मालवली. रविवारी रात्री घरातून निघताना कुटुंबीयांनी चारही मित्रांना आनंदाने निरोप दिला होता. लेह-लडाखच्या आठवणी घेऊन परत येऊ, असे सांगत निघालेल्या या तरुणांपैकी दोघे कायमचे निघून जातील, याची कल्पनाही कुणाला नव्हती. मात्र पहाटे आलेल्या एका दुःखद फोनने दोन्ही कुटुंबांवर शोककळा पसरली. आनंदाचे वातावरण क्षणार्धात दुःखाच्या काळोखात बुडाले. बद्री नांगरे आणि अनिकेत काळे हे परिसरातील परिचित क्रिकेटपटू होते. मैदानावरील त्यांची जिद्द, खेळाप्रती असलेली निष्ठा आणि मित्रपरिवारातील त्यांचा हसतमुख स्वभाव यामुळे ते सर्वांचे लाडके बनले होते. त्यांच्या अकाली निधनाने क्रीडा क्षेत्रासह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, दोन्ही तरुणांच्या पार्थिवावर सोमवारी त्यांच्या मूळ गावी संध्याकाळी सहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार असून गंगापूर व वैजापूर तालुक्यावर शोककळा पसरली आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
मंगळवार दि.०२ जून २०२६ | ६

# मुंडे साहेबांना आवडेल असा संकल्प ३ जूनला करणार

## ना. पंकजाताई मुंडेंनी व्यक्त केला मनोदय; पंतप्रधान मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद द्या

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांची पुण्यतिथी येत्या ३ जून रोजी आहे. यादिवशी मी असा एक संकल्प करणार आहे, जो त्यांना आवडणार आहे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून तो बाजूलाच करता येणार नाही असा संकल्प.. तो काय असेल, हे त्याच दिवशी पहा असा मनोदय राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला आहे.

यासंदर्भात एक व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट करत त्यांनी देशावर आणि जगावरील सध्याचे संकट पाहता मुंडे साहेबांची पुण्यतिथी आपापल्या गावात, घरीच करावी असे आवाहन केले आहे. यात त्या म्हणाल्या, मी सर्वांना आवाहन केलं होतं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही केलं होतं. आज जगावर, आपल्या देशांवर जे संकट ओढवलं आहे, त्यावर उपाय म्हणून आपल्याला काही सावधानता बाळगायच्या आहेत. इंधनाचा



अपव्यय टाळायचा आहे, त्यामुळे भव्य असे आयोजन कांही दिवस नाही केले तर योग्य होईल. मुंडे साहेबांच्या पुण्यतिथीचे आयोजन भव्य असंच असतं. खरं तर, यादिवशी आपल्या मनामध्ये तीव्र दु:ख असतं पण मुंडे साहेबांची ओढ, त्यांचं प्रेम आणि आपला संकल्प हे आपल्या सर्वांची पावलं गोपीनाथगडाकडे घेवुन जातात. सर्वांना परत एकदा विनंती करते की, सर्वांनी मुंडे साहेबांची पुण्यतिथी आपापल्या गावात, घरात, शहरात, वार्डात, आपण जिथे असाल तिथे करावी जेणेकरुन पंतप्रधान मोदींच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देता येईल. एका बांधवाने मला बैलगाडीचा उपाय सुचवला होता पण एवढ्या भर उन्हात पशुंनाही त्याचा



त्रास होवु शकतो, त्यामुळे ते ही टाळावे. त्यांच्या सूचनेचा मी आदर करते पण जसे आपण इंधनाची काळजी घेत आहोत तशी बैलाचीही घ्यावी असे त्या म्हणाल्या.

**असा संकल्प करणार**

३ जून रोजीचा दिनक्रम सांगताना ना.पंकजाताई म्हणाल्या की, मी सकाळी उठून मुंडे साहेबांच्या प्रतिमेचे पूजन करणार आहे. त्यांना आवडणाऱ्या सगळ्या वस्तु आंबे, पुरणपोळी, मसाला वडी जे कांही त्यांना आवडायचे ते सगळे मी गोपीनाथगडावर जाऊन त्यांच्या समाधीसमोर अर्पण करणार आहे. फुलांची आरास तिथे करणार आहे. त्यांनी जीवनात जो संकल्प केला तो संकल्प आपण सर्वांनी पुढे न्यावा अशी प्रार्थना करणार आहे. मुंडे साहेबांना शोभेल असे काम तर मी नेहमीच करते पण एक संकल्प मी त्यादिवशी करणार आहे, त्यांना आवडणारी अशी एक गोष्ट त्यादिवशी सुरू करणार आहे आणि त्यांना अजिबात आवडत नाही अशी बंद करणार आहे. ◀◀ पान ३ वर

## माजलगांव शहर पोलीसांकडून कत्तलीसाठी डांबुन ठेवलेल्या सात जनावरांची सुटका

### शहर पोलीसात वेगवेगळे दोन गुन्हे दाखल: दोन आरोपींना अटक

माजलगाव । प्रतिनिधी

येथील शहर पोलीसांनी गुप्त बातमीदारामार्फ मिळालेल्या माहितीच्या आधारे दि ३१ मे रविवार रोजी चांदनी ग्राउंडजवळ पत्र्याचे शेडमध्ये डांबुन ठेवलेल्या तीन गोवंशीय जनावरांची सुटका करुन त्यांना गोशाळेमध्ये दाखल केले असुन एका आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन माजलगाव शहर येथे गुन्हा दाखल केला आहे. तसेच मनुर रोडलगतच्या पत्र्याचे शेडमध्ये डांबुन चार गोवंशीय



जनावरांची सुटका करुन त्यांना गोशाळेमध्ये दाखल केले असुन दोन आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन माजलगाव शहर येथे गुन्हा दाखल केला आहे. तसेच दिनांक ३० मे २०२६ रोजी ◀◀ पान ३ वर

## बाललैंगिक अत्याचार प्रकरणातील संशयित आरोपींना न्यायालयाकडून अटक पूर्व जामीन

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील आनंदगाव येथील मोगरा शिवारात २८ एप्रिल रोजी घडलेल्या कथित विनयभंग आणि मारहाण प्रकरणी संशयित आरोपीने अर्ज क्र .१४६/२०२६ प्रमाणे माजलगाव येथील माननीय न्यायालयाने अटक पूर्व जामीन मंजूर केला आहे.



या प्रकरणाची थोडक्यात पार्श्वभूमी अशी की, फिर्यादी यांनी दि. ३० एप्रिल रोजी पोलिसांत तक्रार दाखल केली होती. त्यानुसार दि. २७ व २८ एप्रिल रोजी आनंदगाव येथे किरकोळ वाद व विनयभंगाची घटना घडल्याचा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी शाम शिवाजी थावरे सह इतर दोघां विरुद्ध गुन्हा दाखल केला होता.

या गुन्ह्यात अटक टाळण्यासाठी आरोपी नो २ च्या वतीने अॅड हरिष घायतीडक पाटील यांनी माजलगाव न्यायालयात अटक पूर्व जामीन अर्ज दाखल करण्यात आला होता. आरोपींच्या अॅड हरिष घायतीडक पाटील यांचा न्यायालयात जोरदार युक्तिवाद केला. "कथित घटना २८ तारखेची असताना फिर्याद तब्बल दोन दिवसांनी उशिरा म्हणजे ३० तारखेला राजकीय किंवा वैयक्तिक वैमनस्यातून ◀◀ पान ३ वर

## दुर्गराज रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहा-गंगाधर काळकुटे

बीड । प्रतिनिधी

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाच्या ऐतिहासिक क्षणाची आठवण जपणारा आणि स्वराज्याच्या वैभवाचा जागर करणारा अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समिती, दुर्गराज रायगड आयोजित भव्य शिवराज्याभिषेक सोहळा यंदा ५ व ६ जून २०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. समितीचे मार्गदर्शक युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांच्या प्रमुख उपस्थितीत हा ऐतिहासिक सोहळा



पार पडणार असल्याची माहिती समितीचे सदस्य गंगाधर काळकुटे पाटील यांनी बीड येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ६ जून १६७४ रोजी दुर्गराज रायगडावर संपन्न झाला. महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याचा आणि सार्वभौमत्वाचा हा सुवर्णक्षण मानला जातो. याच ऐतिहासिक दिवसाचे स्मरण ठेवण्यासाठी दरवर्षी रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यंदाच्या सोहळ्यात 'धार तलवारीची, युद्धकला महाराष्ट्राची', 'जागर ◀◀ पान ३ वर

## कृषीपंपासाठी आठ तास लाईट द्या

### युसूफवडगांव परिसरातील शेतकऱ्यांची मागणी

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसुफवडगांव परिसरात गेल्या काही दिवसांपासुन शेतीसाठी अत्यंत कमी वेळ लाईट ठेवण्यात येत असल्यामुळे शेतकरी अडचणी आहेत त्यामुळे कृषीपंपासाठी आठ तास लाईट द्यावी अशी मागणी युसुफवडगांव परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

गत काही दिवसांपासुन युसुफवडगांव परिसरातील शेतकऱ्यांना शेती साठी अत्यंत कमी कालावधीसाठी वीज पुरवठा



करण्यात असुन त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे.पाणी असुन पण शेतकऱ्यांना ऊस,फळबांगासाठी पाणी देणे अवघड होऊन बसले आहे.एकतर आधीच यावर्षी कधी नव्हे तापमान कमालीची वाढ झाल्याने शेतकऱ्यांपुढे ऊस व फळबांगा कशा सांभाळायच्या याच प्रश्न पडला आहे.प्रचंड उष्णतेमुळे पीक सुकून जाऊ लागली आहेत त्यांना पाणी देणे गरजेचे आहे,बर पाणी नाही असे नाही पाणी असुन त्यांना ते शेतीसाठी देता येईना कारण आहे वीज प्रश्न शेतीसाठी अतिशय कमी वेळ म्हणजे सध्या फक्त चार तास वीज मिळत असुन ती पण नीट मिळना झाली आहे.त्यात पण काहीना काही कारणाने सारखीच वीज जात असल्याने पीकांना पाणी देणे अवघड होऊन बसले आहे.त्यामुळे ◀◀ पान ३ वर

## घरकुल धारकांच्या हक्काच्या वाळुवर सेतु चालकाने मारला डल्ला

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई तहसीलदार यांनी मोठा गव गवा करत ज्यांना ज्यांना घरकुल मिळाले त्या घरकुल धारकांना ५ पाच ब्रास वाळु दिल्याचा बातम्या मोठ्या थाटामाटात प्रसिद्ध केल्या. मात्र प्रत्यक्षात वाळु वर दुसऱ्यानेच डल्ला मारल्याचे आता समोर आले आहे.**

गढी कारखाना येथील सेतु चालक पठाण नामक व्यक्तीने गावातील ४५ घरकुल धारकांना फोन केले आणि त्यांना सांगितले की तुमचा बांधकाम कामगार चा अर्ज व्हेरीफाय करावा लागेल, त्या करीता तुमच्या मोबाईल वर एक ओटीपी आलेला आहे तेवढा सांगा. आणि सर्व घरकुल धारकांन कडुन ओटीपी मिळवला आणि त्यांच्या नावावर घरकुला करीता आलेली वाळु सेतु चालक शहारुख पठाण आणि टिप्पर चालक वाळु माफीया यांनी संगणमत करत लंपास केली. हा प्रकार एका सुशिक्षित तरुणाच्या लक्षात आला. त्याने आपल्या वडलांच्या मोबाइल वरुण ओटीपी घेऊन गौन खनिज उचलल्या चा मॅसेज ची वाच्यता केली असता ईतर घरकुल धारकांनी सुध्दा आपण आपले मॅसेज चेके केले असता अनेकांच्या मोबाईल वर गौणखनिज उचलले असल्याचे मॅसेज पाहायला मिळाल्याने एकच खळबळ उडाली आणि सर्वांनी सेतु चालक शाहरुख पठान चे सेतु गाठले असता तो दुकान लावुन पळुन गेला. फसवणूक झालेल्या सर्व घरकुल धारकांची मागणी आहे की पुरवठा विभागाने शाहरुख पठाण वरती गुन्हा दाखल करुन त्याल अटक करावी व आम्हाला घर बांधकामा साठी आमच्या हक्काची वाळु द्यावी. यामध्ये अनेक महसूलचे अधिकारी देखील सहभागी असल्याचे बोलले जात आहे अनेकांना त्यांचा वाटा दिला जातो मात्र ज्या गोरगरीब घरकुलधारकांना हक्काची पाच ब्रास वाळू मिळणार होती आता ती देखील या वाळू माफियांनी चोरल्याचे दिसत आहे खरे पाहिले तर तहसीलदार मंडळ अधिकारी आणि तलाठी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

## पुरुषोत्तमपुरी गोदापात्रात बुडणाऱ्या भाविकास वाचवले जवानांचा बाजार समितीच्या वतीने सत्कार



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथे अधिकमासानिमित्त सुरू असलेल्या यात्रोत्सवा निमित्त गोदावरी नदीपात्रात स्नानासाठी उतरलेल्या एका भाविकाचा पाण्याच्या खोल भागात जाऊन बुडण्याचा प्रसंग ओढवला होता. मात्र, तेथे कर्तव्यावर उपस्थित असलेल्या होमगार्ड राजू हरिभाऊ पंडित, मुजाहेद उस्मान शेख, सुरेश वैजनाथ भारस्कर या जवानांनी तत्परता दाखवत संबंधित भाविकास सुखरूप बाहेर काढून त्याचे प्राण वाचवले.

जवानांच्या या धाडसी आणि समयसूचक कार्याची दखल घेत माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सभापती जयदत्त अण्णा नरवडे, उपसभापती श्रीहरी नाना मोरे, माजी उपसभापती निळकंठराव भोसले व ग्रामस्थ उपस्थित होते तर बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांनी जवानांच्या शौर्याचे कौतुक करत समाजाप्रती त्यांच्या सेवाभावाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. अधिकमास यात्रोत्सवादरम्यान भाविकांनी नदीपात्रात स्नान करताना आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. सत्कार कार्यक्रमास बाजार समितीचे पदाधिकारी, ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सेवानिवृत्त सहाय्यक अधिक्षक विलास गव्हाणे यांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

आरोग्य विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी विलास एस. गव्हाणे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सोमवार दि.१ जून रोजी त्यांचा सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्यात विविध मान्यवर व मित्र परिवार उपस्थित होता. यामध्ये मोहनराव कदम, डॉ. शिवाजीराव चव्हाण, रामनाथ शेळके, नामदेव शिंदे, नारायण नागरे, लक्ष्मणराव क्षीरसागर, पाटीलबा बहीर रमेश शिंदे, राम कदम, विठ्ठल टिपाले, खरताडे, तात्या घोलप, रमेश कदम, लहू आखाडे, नवले, लक्ष्मण आखाडे, आदींची उपस्थिती होती.

## गुलाब देत पोलीस म्हणाले, जीव तुमचा आहे अन् नियमही तुमच्यासाठीच

### पोलीसांनी फुलातून फुलवला वाहतुक शिस्तीचा संदेश

बीड । प्रतिनिधी

वाहतूक नियमांचे पालन व्हावे आणि नागरिकांमध्ये रस्ते सुरक्षेबाबत जागृती निर्माण व्हावी यासाठी प्रभारी पोलीस अधिक्षक चेतना तिडके मॅडम आणि अप्पर पोलीस अधिक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि.१ जून २०२६ सोमवार रोजी सकाळी १० ते १२ वाजण्याच्या दरम्यान जिल्हा कारागृहासमोर जिल्हा वाहतूक पोलिसांनी जिल्हा वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील आणि जिल्हा वाहतुक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांच्या नेतृत्वाखाली एक अनोखी मोहीम राबविली. वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर केवळ दंडात्मक कारवाई न करता त्यांचे गुलाबाचे फूल देऊन स्वागत करण्यात आले. पोलिसांच्या या अभिनव उपक्रमाची शहरात चांगलीच चर्चा रंगली आहे.

या मोहिमेदरम्यान चुकीच्या दिशेने वाहन चालविणे, कागदपत्रे जवळ नसणे, इन्शुरन्स नसणे, पीयुसी नसणे, लायसन्स नसणे तसेच इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांना थांबवून त्यांना गुलाबाचे फूल



देण्यात आले. त्यानंतर संबंधित वाहनचालकांना नियमांचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी वाहतूक नियमांचे पालन अत्यंत आवश्यक

## परळीत तीन गावात ४३ गटात २६२ एकर जमीन तलाठ्यांनी वाढवली

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात कधी काय होईल हे सांगता येत नाही. बोगस पिक विमा, लागत नसताना रेल्वेसाठी अतिरिक्त जमिनीचे संपादन, अशा अनेक घटनानंतर आता परळी तालुक्यातील तीन गावांमध्ये फक्त त्रेचाळीस गटांच्या सातबारा मध्ये अस्तित्वात नसलेल्या जमिनीच्या मालकांची नावे तलाठ्यांनी बोगस रीतीने लावले आहेत. या सातबाराचा आधार घेऊन हे बोगस लोक पीक कर्ज, पिक विमा आणि इतर सर्व लाभ घेत असल्याचे समजते. त्यामुळे सर्व दोषींना जेल मध्ये घालावे, असे जन आंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष अॅड. अजित देशमुख यांनी म्हंटले आहे.

बीड जिल्हा सातत्याने भ्रष्ट कामात गाजत आहे. त्यात आता नवीन मार्ग निवडत पिक विमा आणि पीक कर्जासाठी ही पळवाट शोधली जात असून बोगस पिक विमा घेणे आणि बोगस कर्ज घेऊन कर्जमाफी मिळवणे, असा उद्योग चालू असल्याची ही तक्रार आहे. प्रशासनातील तलाठी, मंडळ अधिकारी आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवणारे तहसीलदार हे सर्व यात सहभागी असल्याचे देखील देशमुख यांनी म्हटले आहे. तक्रार झाल्यानंतर ताबडतोब ही नावे आणि वाढलेली शेती कमी व्हायला पाहिजे. परंतु प्रशासन पातळीवर हे केले जात नाही. चौकशीचा फक्त फार्स दाखवला जातो. यावरून भ्रष्ट प्रशासन जोपर्यंत सुधरत नाही, तोपर्यंत बीड जिल्हा सुधारणार नाही, असेही अॅड. देशमुख यांनी म्हंटले आहे.

परळी तालुक्यातील धर्मापुरी, दैठणा आणि हेळम या तीन गावाची माहिती देशमुख यांना मिळाली आहे. यापैकी धर्मापुरी या गावातील एकूण १४५४ गट क्रमांक पैकी १३ गट क्रमांक मध्ये २६० एकर जमीन वाढली आहे. त्याचबरोबर दैठणा घाट या गावात एकूण ४९८ गट नंबर मधील १६ गट नंबर मध्ये ९५ एकर ३० गुंठे जमीन वाढली आहे. आणि हेळम या गावात ७८७ पैकी १४ गटांमध्ये ९३ एकर ९४ एकर ४७ गुंठे जमीन वाढली आहे म्हणजेच माहिती मिळालेल्या ४३ गटांमध्ये २६२ एकर जमीन वाढली आहे.

या वाढलेल्या क्षेत्राच्या आधारे किती लोकांनी कोणत्या पिकाचा पिक विमा भरलेला आहे ? त्यांनी पीक विम्याचा लाभ घेतला आहे का ? त्याचप्रमाणे यातील किती बोगस नाव वाल्यांनी तलाठ्याशी पीक पेरा संगनमताने पीक कर्ज घेतलेली आहे, हे पीक कर्ज वसूल झाले आहे का ? यांची नावे पीक कर्जमाफीमध्ये आहेत का ? या बाबीची तपासणी आवश्यक आहे. बीड जिल्ह्यातील हा प्रकार तपासल्याशिवाय पिक कर्ज माफी देणे चुकीचे होणार आहे. शेतकऱ्यांना तात्काळ माफी द्या, मात्र बोगस लोकांना माफी न देता तात्काळ कर्ज व्याजासह वसुल करा, असेही अॅड. देशमुख यांनी म्हटले आहे.

धर्मापुरी येथील कार्यकर्ते सामाजिक कार्यकर्ते तथा शेतकरी रवींद्र मुंडे यांनी ही बाब गेल्या काही महिन्यांपासून तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार यांना सांगितली आहे. त्यांनी याबाबत विचार तक्रार दाखल करून पोहोच देखील घेतली आहे. मात्र प्रशासन पातळीवर ही तक्रार अजून प्रलंबित असल्याने रवींद्र मुंडे यांनी अॅड. देशमुख यांचे कडे या प्रकरणात मदत मागितली असून शासनाची फसवणूक थांबवण्याचे आवाहन केले आहे.

दरम्यान भ्रष्टाचाराचे सर्व प्रकार शिकायचे असतील तर त्या व्यक्तीने बीड जिल्ह्यात काही दिवस रहायला हवे. बीड जिल्ह्यात प्रशासन देखील किती भ्रष्ट असू शकते याची अनेक नमुने आपण उघडकीस आणले असून हा नवा नमुना आता उघडकीस आणणार असल्याचे अॅड. देशमुख यांनी म्हटले आहे. दरम्यान या गंभीर प्रकाराची तक्रार अॅड. देशमुख यांनी पुराव्यासह जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या कडे दाखल केली आहे. त्याचप्रमाणे शासनाकडे देखील याबाबत तक्रार देण्यात आली आहे. गावागावातील कार्यकर्त्यांनी भ्रष्ट कारभार रोखण्यासाठी रवींद्र मुंडे यांच्या प्रमाणे पुढे यावे, असे आवाहन देखील देशमुख यांनी केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26